मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » शनिवार, २२ मार्च २०२५ » वर्ष: ६ » अंक:९३ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## महाराष्ट्र युवक काँग्रेसच्या नियुक्त्या अवघ्या आठ तासांत रद्द

पुणे, दि. २१ प्रतिनिधी
युवक काँग्रेसलाही गटबाजीचे ग्रहण लागले आहे. प्रदेश शाखेच्या नव्याने करण्यात आलेल्या सर्व नियुक्त्या अखिल भारतीय युवक काँग्रेसने अवघ्या ८ तासांमध्ये रद्द केल्या आहेत. राज्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत यांनी रात्री १२ वाजता नवीन नियुक्त्यांची यादी अधिकृत व्हॉट्सऍप ग्रुपवर जाहीर केली. मात्र, भारतीय युवक काँग्रेसच्या दिल्ली मुख्यालयाने सकाळीच या नियुक्त्या रद्द केल्याचे पत्र प्रसिद्ध केले. या पत्रात स्पष्ट नमूद करण्यात आले की, नियुक्त्या कोणत्याही अधिकृत मंजुरीशिवाय केल्या गेल्याने त्या अवैध ठरविण्यात आल्या आहेत.

अग्राग्रलेख
खरीखरी

## दादांचा खरेपणा

आपले अजितदादा स्पष्ट वक्तेपणासाठी प्रसिद्ध आहेत. लाडक्या बहिणींचे दादा म्हणून विधान सभेच्या निवडणुकीच्या आधी त्यांनी आपल्या लाडक्या बहिणींना दरमहा पंधराशे रुपये दिले होते. या लाडक्या बहिणींना महायुतीचे सरकार आल्यावर दरमहा २१०० रुपये देऊ, असे आश्वासन तत्कालीन सरकारनेही दिलेले होते. निवडणुकीच्या तोंडावर इतरही बरीच आश्वासने देण्यात आली होती. त्याच्यामध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी, वीज बिलाची माफी यासारख्या बऱ्याच फुकट योजनांची खैरात आणि जाहिरात करण्यात आली होती. या फुकटेगिरी नंतर एक तर राज्याची आर्थिक शिस्त बिघडते. त्याबरोबरच फुकट पैसे मिळाल्यावर अनेक बहाद्दर कामच करत नाहीत. यामुळे आळशीपणा वाढतो आणि ऐन तारुण्यात 'दे हरी पलंगावरी' अशी फुकटेगिरीची भावना आपोआपच जागृत होते. हे सर्व गेल्या पंधरा-वीस वर्षात चांगलेच फोफावलेले आहे. या सर्व योजना चालू ठेवणे. म्हणजे राज्यावर न फिटणाऱ्या कर्जाचा बोजा वाढवण्यासारखे आहे. गरिबांना मदत केलीच पाहिजे. पण ती मदत करताना कोणतेही काम करायचेच नाही. असे वातावरण तयार केल्यावर समाजात काम करण्याची लालसा जरा तरी शिल्लक उरेल काय, असा आमचा साधा सवाल आहे. अजितदादा यांनी काल विधानसभेत त्यांच्या स्वभावाप्रमाणे स्पष्टपणे सांगून टाकले आहे की, सध्या आपली म्हणजे राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. जे सरकार काही वर्षांपूर्वी देशातील सर्वात श्रीमंत होते. ज्या सरकारवर कवडीचे कर्ज नव्हते. जे राज्य देशाला आदर्श राज्य म्हणून माहीत होते. असे आपले एकमेव महाराष्ट्र राज्य होते. पण आता आपल्या बोडक्यावर जवळजवळ हजार लक्ष कोटी रुपयांचे कर्ज आहे. जे आपल्याच राज्यातील जनतेच्या बोकांडीवर बसलेले आहे. या कर्जाचे हप्ते आणि त्याचे व्याज भरता भरता आता सरकारचा गळा पकडणे तेवढेच बाकी उरलेले आहे. अजितदादा आता म्हणतात, सगळी सोंगे करता येतात. पण पैशाचे सोंग करता येत नाही. हा साक्षात्कार विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी झाला असता. तर आपला म्हणजेच आपल्या राज्याचा मोठा फायदा झाला असता. आताही उपमुख्यमंत्र्यांनी २१०० देणार नाही असे म्हटलेले नाही. पण २१०० रुपये केव्हा देऊ, याबाबतीत अजितदादा हतबल झालेले दिसतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मोठी पावले उचलण्याचे ठरवलेले दिसत आहे. अजित दादांकडे अर्थ आहे. तर मुख्यमंत्र्यांना परमार्थ साधायचा आहे. पण सध्या महाराष्ट्राच्या तिजोरीत पैशाची वाणवा आहे. हजारो कोटी रुपयांच्या योजना निवडणुकीपूर्वी धबधब्यासारख्या धोधो बरसू लागल्या. त्यामुळे महाराष्ट्राची जनता त्यामध्ये अक्षरशा न्हाऊन निघालेली आहे. आता लोक प्रश्न विचारत आहेत. तो असा की, एक साधा प्रश्न माझा लाख येती उत्तरे, हे खरे की ते खरे की ते खरे की ते खरे अशा मनस्थितीत महाराष्ट्राच्या जनतेला विचारात घेऊन अजित पवार यांनी जो स्पष्टवक्तेपणा दाखवलेला आहे. त्याबद्दल अजितदादांचे अभिनंदन केलेच पाहिजे. म्हणजेच अंथरूण पाहून आपले पाय लांब करायचे असतात, असे आता दादांचे म्हणणे आहे. आपल्या अनेक नेत्यांनी वेगवेगळ्या योजनांच्या घोषणा करून निवडणुकीच्या रिंगणात स्वतःला पवित्र करून घेतले. पण ही पवित्रता सिद्ध करण्यासाठी जे तेव्हा प्रसिद्ध केले आणि ते मागण्यासाठी जनता कटिबद्ध झाली. तर त्यात जनतेचा काही दोष आहे. असे कोणी म्हणेल काय, अर्थात असे आम्हीही म्हणत नाही. तुम्ही द्यायला तयार आहात ना, मग आम्ही घ्यायला तयार आहोत. पण आता हा निर्णय घेण्याचा व्यवहार पुढील काही काळासाठी थांबविणे गरजेचे आहे, असे अजित दादा यांचे म्हणणे आहे. आपला महाराष्ट्राचा नावलौकिक पुन्हा मिळवायचा असेल. तर जनतेच्या रागा-लोभाचा विशेष विचार न करता दूरदृष्टीने काही निर्णय अत्यंत कठोरपणाने घ्यावे लागतील. अजितदादा है तो सब चंगा ही होगा, असे अनेक मराठी लोक चक्क हिंदीमध्ये बोलतात आपल्या महाराष्ट्राचे पोटकल्याण आणि नवकोट कल्याण एकाच वेळी होऊ शकणार नाही. हे आमच्या पुढाऱ्यांनीही ध्यानात ठेवले पाहिजे. आता आपण काही काळासाठी अजितदादांची शिस्त अंगी बाळगली पाहिजे. जे मिळते आहे, त्यात समाधान मानून महाराष्ट्राचा कर्जबाजारीपणा वाढवणे. कधीही अस्सल मराठी माणसाला शोभणार नाही. त्यामुळेच अजित दादांचे खडे आणि खरे बोल प्रत्येकासाठी आदर्शवत आहेत. असे आपण समजून घेतले पाहिजे. आकाशी भरारी घेण्यापेक्षा जमिनीवर चालणे कठीण आहे, असे न समजता आपले पाय आपण जमिनीवरच ठेवावे. हाच आपल्या अर्थमंत्र्यांचा म्हणजेच अजितदादांचा संदेश आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# सीबीएसई- एससीसी अभ्यासक्रमात 70 -30 फॉर्म्युला

मुंबई, दि. २१ प्रतिनिधी
महाराष्ट्रातील सरकारी शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू केला जाणार आहे. महाराष्ट्र बोर्डाच्या शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याबाबतच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांसाठी हे शिक्षण कसे असेल? विद्यार्थ्यांना शिकवणारे शिक्षक यासाठी कितपत तयार असतील? शिक्षणाचा फॉर्म्युला काय असेल? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. यासंदर्भात सविस्तर जाणून घेऊया.

येत्या 2025-26 या शैक्षणिक वर्षांपासूनच सीबीएससी अभ्यासक्रम लागू करण्याबाबत हालचाली सुरु आहेत. दरम्यान शालेय शिक्षण मंत्री दादा भूसे यांनी विधान परीषदेत यासंदर्भात माहिती दिली. विधान परीषदेत विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भूसे यांनी लेखी उत्तर दिले. भाजप आमदार प्रसाद लाड यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.



राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात 70 टक्के - 30% फॉर्म्युला राबवला जाणार आहे. यामध्ये 70 टक्के सीबीएससी तर 30 टक्के राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम असणार आहे. भाषा आणि इतिहास विषयाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी माहिती शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी दिली.

सीबीएससी अभ्याक्रमातील इतिहास विषयात राज्य शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील 30% मध्ये छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, ताराराणी आणि मराठा साम्राज्याचा इतिहास शिकवला जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

यावर्षी पहिली इयत्तेला सीबीएससी अभ्यासक्रम असेल त्यानंतर दरवर्षी एकेक इय्यतेचा अभ्यासक्रम बदलला जाणार आहे. नव्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके छापण्याची जबाबदारी राज्य शिक्षण मंडळाची असणार आहे. 1 जूनला शाळा सुरू झाल्यानंतर लगेच शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

### शाळांचे वर्षभराचे वेळापत्रक यंदा कोलमडण्याची भीती

शाळांचे वर्षभराचे वेळापत्रक यंदा कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यामध्ये शिक्षण विभागाकडून अचानक पहिल्या इयत्तेपासून नवव्या इयत्तेपर्यंतची वार्षिक परीक्षा एप्रिलअखेरीस घेण्याची सूचना जारी केली. मात्र या सुचनेमुळे शैक्षणिक वर्तुळात गोंधळ उडाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या परीक्षा पूर्वीच्या वेळापत्रकानुसारच व्हाव्यात, अशी शिक्षकांसह पालकांची मागणी आहे. त्यातच आता मुंबईतील शाळांमधील मुख्याध्यापकांसमोर या निर्णयामुळे नवा प्रश्न निर्माण झाला आहे. आताच्या नव्या सुचनेप्रमाणे परीक्षा संपवून नवीन शैक्षणिक वर्षातील दहावीचा अभ्यासक्रम कधी सुरू करायचा, असा प्रश्न मुख्याध्यापकांना पडलाय. अनेक शाळांमध्ये इयत्ता दहावीचे वर्ग एप्रिल महिन्यातच घेण्यास सुरु होतात. सामान्यप्रमाणे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्याआधी दहावीच्या मुलांचे वर्ग सुरु होतात. याच काळात दहावीच्या मुलांचा बराचसा अभ्यासक्रमही पूर्ण करतात. मात्र आता नव्या सुचनेनुसार वार्षिक परीक्षाच 22 एप्रिलपर्यंत सुरू राहणार असून त्यामुळे दहावीच्या या वर्गांचे नियोजन आता करता येणार नाही, अशी खंत शिक्षकांसह पालक आणि विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

# राज्याचा एसएससी बोर्ड पूर्णतः बंद करण्याचा डाव -सुप्रिया सुळे

मुंबई, दि. २१ प्रतिनिधी
राज्य सरकारने महाराष्ट्रातील सर्वच शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू करण्याचा निर्णय घेतला असून शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात विधिमंडळ सभागृहात लेखी उत्तर दिले होते. त्यानुसार, यंदाच्या वर्षांपासून राज्यात सीबीएसई पॅटर्ननुसार शाळांचा अभ्यासक्रम शिकवला जाईल. मात्र, यंदा केवळ पहिलीच्याच वर्गासाठी सीबीएसई पॅटर्न असेल, त्यानंतर टप्प्या टप्प्याने पुढील वर्षात हा पॅटर्न राज्यातील शाळांमध्ये लागू होईल. मात्र, सीबीएसई पॅटर्न घेतल्यानंतरही शाळांना मराठी अनिवार्यच असणार असल्याचे मंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले. मात्र, राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू करण्याला राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी थेट विरोध केला आहे. महाराष्ट्र राज्याला शिक्षणाची उज्ज्वल परंपरा आहे, तिच्याकडे दुर्लक्ष करुन इतर बोर्डाचे अनुकरण करण्याचा निर्णय हा राज्यातील एसएससी बोर्ड पूर्णत: बंद करण्याचा डाव असल्याचा गंभीर आरोप सुळे यांनी केला आहे. तसेच, यासंदर्भात शासनाने फेरविचार करावा, अशी मागणी देखील त्यांनी पत्राद्वारे केली आहे.



महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनात शिक्षणमंत्री महोदयांनी राज्यात सीबीएसई पॅटर्न लागू करण्याची घोषणा केली. राज्याला अतिशय उज्ज्वल शिक्षण परंपरा आहे. पण तिच्याकडे दुर्लक्ष करुन इतर बोर्डाचे अनुकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला ही अतिशय खेदजनक बाब आहे. या माध्यमातून राज्याचा एसएससी बोर्ड पूर्णतः बंद करण्याचा डाव या सरकारने आखला आहे असे दिसत असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. संत, सुधारक आणि शिक्षणाची उज्ज्वल परंपरा असणाऱ्या आपल्या महाराष्ट्राची ओळख या निर्णयामुळे पुसणार तर नाही ना अशी शंका वाटते. हा निर्णय अभिजात भाषा मराठी, संस्कृती आणि परंपरेला मारक ठरणार आहे. माझी राज्य सरकारला नम्र विनंती आहे की कृपया आपण या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी देखील सुप्रिया सुळे यांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

# न्यायालयात ते काय पुरावे देत आहेत यावर पुढची भूमिका ठरेल

## सालियनप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केली सरकारची भूमिका

मुंबई, दि. २१ प्रतिनिधी
गेल्या चार दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात दिशा सालियन मृत्यू प्रकरणाने खळबळ उडवून दिली आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी न्यायालयात याचिका दाखल केली असून दिशाची हत्या झाल्याचा दावा केला आहे. शिवाय त्यांनी आदित्य ठाकरेंचाही उल्लेख केल्यामुळे त्यावरून राजकीय वर्तुळात सत्ताधारी व विरोधकांमध्ये विधिमंडळाच्या आत आणि बाहेर अशा दोन्ही ठिकाणी खडाजंगी पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर पहिल्यांदाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणावर सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे.

देवेंद्र फडणवीसांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये यावर भाष्य केले आहे. “ही सगळी चर्चा कोर्टाच्या केसमुळे सुरू झाली. उच्च न्यायालयात एका वकिलानं याचिका दाखल केली आहे. दिशा सालियनच्या वडिलांनीही एक मुलाखत दिली आहे. शासनाची भूमिका यासंदर्भात पक्की आहे. न्यायालय काय म्हणतंय? न्यायालयात ते काय पुरावे देत आहेत? यावर पुढची भूमिका ठरेल”, असं देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं.



“आत्तातरी शासनाच्या किंवा पोलिसांच्या पातळीवर हा विषय नाही. न्यायालय ज्या प्रकारे आम्हाला आदेश देईल किंवा न्यायालयात जर काही नवीन पुरावे, गोष्टी आल्या तर त्या आधारावर त्या वेळी सरकार निर्णय घेईल. आत्तातरी आम्ही न्यायालयाकडे नजर ठेवून आहोत”, असं ते म्हणाले.

दिशा सालियनच्या वडिलांनी बुधवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये गंभीर आरोप केले आहेत. १४व्या मजल्यावरून पडूनही दिशाच्या शरीरावर एकही जखम कशी झाली नाही? हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या आधारावर दिशानं आत्महत्या केली नसून तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यांच्या वकिलांनी यात थेट आदित्य ठाकरे, उद्धव ठाकरे व सूरज पांचोली यांची आरोपी म्हणून नावं घेत खळबळ उडवून दिली आहे.

सतीश सालियन यांच्या पत्रकार परिषदेपासून आदित्य ठाकरेंना सत्ताधाऱ्यांकडून लक्ष्य केलं जात आहे. या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरेंनी गुरुवारी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना त्यांची भूमिका मांडली. “हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयात त्यांच्या आरोपांवर जे काही उत्तर द्यायचं ते आम्ही देऊ. पण इतर मुद्द्यांवरून लक्ष भरकटवण्यासाठी हा मुद्दा उपस्थित केला जात आहे. या मुद्द्यावर त्यांना सभागृह बंद पाडायचं असेल तर खुशाल पाडावं. पण मी मुद्द्यावर बोलत राहणार”, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

दरम्यान, या मुद्द्यावरून अनिल परब विरुद्ध चित्रा वाघ अशी थेट खडाजंगीही सभागृहात पाहायला मिळाली. पाच वर्षांनंतर का याचिका दाखल केली गेली, असा सवाल शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या नेत्यांकडून उपस्थित केला जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरेंविरोधात या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात असताना त्यांच्याविरोधात कारवाई करण्यासाठी सरकार सकारात्मक आहे का? यासंदर्भात चर्चेला उधाण आलं आहे. त्याबाबत विचारणा केली असता देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

# एका वर्षात 2619 नक्षलवादी कमी झाले

## मार्च 2026 पर्यंत नक्षलवाद संपणार - अमित शहांची राज्यसभेत घोषणा

नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत गृह मंत्रालयाच्या कामकाजावरील चर्चेला उत्तर दिले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा त्यांच्या वृत्तीसाठी देशभर प्रसिद्ध आहेत. त्याची गर्जना संसद भवनाच्या आत आणि बाहेरही पाहायला मिळते. राज्यसभेत मंत्रालयाच्या कामकाजावर उत्तर देताना गृहमंत्र्यांनी भाजप सरकारच्या गुणवत्तेची माहिती दिली आणि अनेक मोठ्या गोष्टी सांगितल्या. पंतप्रधान मोदींचा कार्यकाळ आणि काश्मीरमधील परिस्थितीबाबतही त्यांनी अनेक गोष्टी सांगितल्या. याशिवाय नक्षलवाद्यांबाबतची आकडेवारीही त्यांनी सादर केली.

राज्यसभेत बोलताना गृहमंत्री म्हणाले की, गृह मंत्रालय अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे. गुन्ह्यांचा संदर्भ देताना ते म्हणाले की, आमच्या सरकारने गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याचे काम केले असून गेल्या 10 वर्षात पंतप्रधान मोदींनी अनेक वर्षांपासून न झालेले बदल एकत्र आणून राज्याची सुरक्षा सुनिश्चित करण्याचे काम केले आहे. तसेच एका वर्षात 2619 नक्षलवादी कमी झाले असून मार्च 2026 पर्यंत नक्षलवाद संपुष्टात येईल असेही सांगितले.

यावेळी त्यांनी दहशतवादावर जोरदार हल्ला चढवला आणि सरकारच्या झीरो टोलरंस धोरणाचा उल्लेख केला. कलम 370 सह सर्व मुद्द्यांवर त्यांनी काँग्रेससह विरोधकांना कोंडीत पकडले.



ते म्हणाले की, चार दशकांपासून देशात तीन नासूर फोड होते, पहिला - दहशतवाद, दुसरा - नक्षलवाद आणि तिसरा - उग्रवाद. आम्ही दहशतवादाला चोख प्रत्युत्तर दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण स्वीकारले.

अमित शहा म्हणाले, '21 सदस्यांनी सभागृहात आपले मत मांडले. एक प्रकारे गृहमंत्रालयाच्या अनेक कामांची परिमाणे जोडण्याचा प्रयत्न झाला. सर्वप्रथम, मी हजारो राज्य पोलीस आणि केंद्रीय निमलष्करी दलांचे कृतज्ञता व्यक्त करतो ज्यांनी देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी तसेच सीमा मजबूत करण्यासाठी सर्वोच्च बलिदान दिले.

राज्यसभेत गृह मंत्रालयाच्या कामकाजावर झालेल्या चर्चेला उत्तर देताना अमित शाह म्हणाले, 'एकप्रकारे गृह मंत्रालय अत्यंत कठीण परिस्थितीत काम करते. राज्यघटनेने कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी राज्यांना दिली आहे. सीमा सुरक्षा आणि अंतर्गत सुरक्षा गृह मंत्रालयाच्या अंतर्गत येतात. हा योग्य निर्णय आहे. यामध्ये कोणताही बदल करण्याची गरज नाही, परंतु कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी राज्यांवर असताना, 76 वर्षांनंतर आता परिस्थिती अशी आहे की अनेक प्रकारचे गुन्हे आता राज्याच्या सीमेपुरते मर्यादित राहिलेले नाहीत, ते आंतरराज्यीय आणि बहुराज्यीय आहेत - जसे अंमली पदार्थ, सायबर गुन्हे, संघटित गुन्हेगारी टोळ्या, हवाला. हे सर्व गुन्हे केवळ एका राज्यात होत नाहीत.

### 'गृहमंत्रालयात बदल करणे आवश्यक'

ते म्हणाले की, देशात अनेक गुन्हे बाहेरूनही होतात. त्यामुळे या सर्व बाबी लक्षात घेऊन गृहमंत्रालयात बदल करणे गरजेचे बनले आहे. मी हे अभिमानाने सांगतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 10 वर्षात राष्ट्रीय सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी गृह मंत्रालयात दीर्घकाळ प्रलंबित बदल केले आहेत.

# महाराष्ट्रात गुजरातमधून मोठ्या प्रमाणात गुटखा येतो विजय वडेट्टीवारांचे विधानसभेत वक्तव्य

मुंबई, दि. २१ प्रतिनिधी
राज्यात मोठ्या प्रमाणात गुटखा हा गुजरातमधून येतो. आज गुटख्यामुळे अनेक लोक मरत आहेत. सरकारने एकतर कडक कारवाई करावी किंवा गुटख्यावरील बंदी उठवावी, असे वक्तव्य विधानसभेचे माजी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केले. यामुळे सभागृहात गदारोळ झाल्याचे दिसून आले. तर राज्याचे गृहराज्य मंत्री योगेश कदम यांनी गुटखा व्यापाऱ्यांना पाठीशी घातले जाणार नाही, कडक कारवाई केली जाईल, असे उत्तर दिले.

शिवसेना शिंदे गटाचे आमदार दिलीप लांडे यांनी आज विधानसभेत गुटख्यावरून लक्षवेधी मांडली. त्यांनी म्हटलं की, साकीनाका पोलीस स्टेशनमध्ये महीम नावाचा गुटखा आपल्या शेजारच्या राज्यातून येतो. सकाळी तीन ते पाच या दरम्यान आठवड्यातून दोन वेळेस मोठ्या प्रमाणात गुटखा येतो. हे खरे आहे का आणि असल्यास याच्यावर कारवाई का केली नाही घाटकोपर पोलीस स्टेशनच्या हद्दीत बीट चौकीच्या बाजूला दहा मीटरवर गुटखा आणि अंमली पदार्थ विकले जातात, हे पोलिसांना दिसत नाही का? त्याच्या समोरच्या जागेत सात लोकांचं



रॅकेट आहे, त्या ठिकाणी काही कारवाई होणार का हिरानंदानी ही उच्च वस्ती आहे. हिरानंदानी कॉलेजच्या परिसरात दहा मीटरवर पान स्टॉल सुरु आहे. या स्टॉलच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ विकले जातात, यावर कारवाई करणार का? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

यावर गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, विलास लांडे यांच्या मतदारसंघात फईम अहमद शेख नावाच्या व्यक्तीचे त्याच्या भावाच्या नावाने दुकान आहे. गुटख्याच्या विक्रीमध्ये या व्यक्तीला अगोदर देखील अटक केलेली आहे. त्याच्यावर गुन्हा देखील दाखल केलेला आहे. त्याची तडीपारी देखील करण्यात आली होती. परंतु, हायकोर्टातून तरीपारी रद्द करण्यात आली. कोणीही अनधिकृतपणे व्यवहार करत असेल तर त्याच्यावर कारवाई केली जाईल. तुमच्याकडे जे पण माहिती उपलब्ध आहे ती माहिती मला द्यावी, नक्कीच यावर कठोर कारवाई केली जाईल असे त्यांनी म्हटले.

# परभणीत पोलिसांना कोंबिंग ऑपरेशन, लाठीहल्ल्याचे आदेश कोणी दिले होते ? - काँग्रेसचा हल्लाबोल

मुंबई, दि. २१ प्रतिनिधी
परभणीतील आंबेडकरी विचारांचा सुशिक्षित तरुण सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पोलीसांच्या मारहाणीमुळे झाला असताना त्याची आकस्मित मृत्यू अशी नोंद करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. हा मृत्यू कोठडीत असताना पोलिसांच्या मारहाणीमुळे झाला असा शवविच्छेदन अहवाल असतानाही सरकारने ते गांभिर्याने घेतले नाही. आता न्यायदंडाधिकारी यांच्या अहवालातही सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू मारहणीमुळेच झाल्याचे उघड झाले आहे. आता तरी फडणवीस सरकार जागे होऊन संबंधित पोलिसांवर हत्येचे गुन्हे दाखल करून त्यांना बडतर्फ करणार आहे? का असा संतप्त सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विचारला आहे.


यासंदर्भात प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, परभणीची घटना अत्यंत गंभीर व माणूसकीला काळीमा फासणारी आहे. परभणीत संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्याचे प्रकरण पोलीसांना व्यवस्थित हाताळता आले नाही. शहरात शांततेने आंदोलन सुरु असताना पोलिसांनी अमानुष लाठीहल्ला केला, त्यात अनेकांना जबर मारहाण झाली, अनेकांना जेलमध्ये टाकले. यावेळी सोमनाथ सुर्यवंशी यांनाही अटक करुन त्यांना बेदम मारहाण करण्यात आली व त्यातच त्यांचा मृत्यू झाला पण सरकारने हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू दम्याच्या आजाराने झाल्याची चुकीची माहिती देऊन दिशाभूल केली.

परभणीमध्ये कोंबिंग ऑपरेशन व लाठीचार्ज करण्याचा आदेश कोणी दिला. मंत्रालयातून दिला, का पोलीस महासंचालक कार्यालयातून दिला याची चौकशी झाली पाहिजे. गृहमंत्री व मुख्यमंत्री नात्याने फडणवीस हे परभणीचे प्रकरण हाताळण्यात सपशेल फेल झाले आहेत. एका दलित तरुणाचा पोलिस मारहाणीत मृत्यू होतो पण सरकार त्याकडे गांभिर्याने पहात नाही यातून भाजपा युतीचे सरकार दलित विरोधी आहे हे स्पष्ट दिसते. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी यांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन परभणीला येऊन सुर्यवंशी यांच्या कुटुंबाचे सांत्वन केले व न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. काँग्रेस पक्ष सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा करेल, असेही सपकाळ म्हणाले.

# मी लग्न नाही केले, लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये होतो

## करुणा शर्मा प्रकरणात धनंजय मुंडेंच्या बाजूने युक्तिवाद

मुंबई, दि. २१ प्रतिनिधी
माजी मंत्री धनंजय मुंडे आणि करुणा शर्मा यांच्या पोटगी प्रकरणाची



सुनावणी सुरू आहे. आज या प्रकरणातील सुनावणी झाली. दरम्यान, २९ मार्चपर्यंत ही सुनावणी तहकूब करण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी वेळ मागून घेतल्याने सुनावणी तहकूब केली आहे. दरम्यान, करुणा शर्मा यांच्या वकिलांनी आज कोर्टात कोणते युक्तिवाद केले याची माहिती दिली.

करुणा शर्मा यांचे वकील म्हणाले, आजच्या सुनावणीवेळी मुंडे यांनी लग्न केलेले नाही. त्यांचं म्हणणे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये होतो असा त्यांनी युक्तिवाद केला आहे. या रिलेशनशिपचा किती पिरेड आहे. हे गृहीत धरतात. २७ वर्षाचा पिरीअड त्यातून दोन मुल जन्माला, त्यांचं वय १८, १९ वर्षे हे लिव्ह इन रिलेशनशिप म्हणता येणार नाही. दोन तीन वर्षाचा लिव्ह इन पिरेड असू शकतो, असंही वकील म्हणाले.


"ते एक राजकीय संघटना चालवत आहेत, आर्थिक परिस्थिती त्यांची चांगली आहे. २९ तारखेला कोर्ट फायनल निकाल देणार आहे, असंही वकील म्हणाले.

दरम्यान, यावर करुणा शर्मा यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. करुणा शर्मा म्हणाल्या, आम्ही १५ लाखांची पोटगीची मागणी केली आहे. कमीत कमी आम्हाला महिना नऊ लाख रुपये पाहिजे आहे. मुंडे यांनी यांनी या सुनावणीला आव्हान दिले आहे. २९ मार्च रोजी यावर सुनावणी होणार आहे.

# दिल्लीत आगीनंतर न्यायमूर्तींच्या घरात आढळला नोटांचा ढीग; सरन्यायाधीशांनी केली बदली

नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था
सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याची शिफारस केली आहे. वर्मा यांच्या सरकारी बंगल्यात आग लागल्यानंतर मोठ्या प्रमाणात बेहिशेबी रोख रक्कम सापडली. त्यानंतर ही शिफारस करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध चौकशी किंवा महाभियोग चालविला जाऊ शकतो, अशीही चर्चा सुरू झाली आहे. यामुळे न्यायालयीन वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

त्यांच्या सरकारी निवासस्थानाला आग लागल्याची घटना नुकतीच घडली. यावेळी ते शहराबाहेर होते. त्यांच्या कुटुंबाने अग्निशमन दल आणि पोलिसांना फोन केला. आग विझविताना त्यांच्या घरातून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जप्त करण्यात आली. बेहिशेबी रक्कम जप्त झाल्याची अधिकृत नोंद करण्यात आली असून मुख्य न्यायाधीशांना याबद्दल माहिती देण्यात आली. यानंतर कॉलेजियमच्या बैठकीत त्यांच्या बदलीची शिफारस करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील कॉलेजियमला त्यांची दुसऱ्या उच्च न्यायालयात बदली करण्याचा निर्णय घ्यावा लागला. या घडामोडीनंतर, काही न्यायाधीशांनी चिंता व्यक्त केली आहे. केवळ बदल्यांमुळे न्यायव्यवस्थेची प्रतिमा खराब होईल. म्हणूनच चौकशी आणि महाभियोग प्रक्रियेवरही चर्चा केली जात आहे.



दरम्यान या सगळ्या प्रकरणानंतर आता न्यायाधीश वर्मा यांचा राजीनामा होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मात्र, न्यायाधीश वर्मा यांनी जर स्वत:हून या प्रकरणी राजीनामा दिला नाही तर त्यांच्यावर थेट कारवाई करणं तितके सोप्पे नाही. त्यामुळे न्यायाधीश वर्मा यांच्यावर काय कारवाई होणार असा सवाल उपस्थित होतो.

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचा जन्म ६ जानेवारी १९६९ रोजी झाला. त्यांनी दिल्ली विद्यापीठाच्या हंसराज कॉलेजमधून बी.कॉम. (ऑनर्स) केले. त्यानंतर १९९२ मध्ये त्यांनी रेवा विद्यापीठातून कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. ८ ऑगस्ट १९९२ रोजी त्यांनी वकील म्हणून नोंदणी केली आणि अलाहाबाद उच्च न्यायालयात प्रॅक्टिस सुरू केली.


त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. मार्च २०२४ मध्ये, त्यांनी आयकर पुनर्मूल्यांकनाविरुद्ध काँग्रेस पक्षाने दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. याशिवाय, जानेवारी २०२३ मध्ये त्यांनी नेटफ्लिक्सच्या 'ट्रायल बाय फायर' या वेब सिरीजवर बंदी घालण्यास नकार दिला. या प्रकरणात, रिअल इस्टेट व्यावसायिक सुशील अन्सल यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती.

ज्यावर निकाल देताना न्यायमूर्ती वर्मा म्हणाले होते की, 'सरकार आणि न्यायालये काही गोष्टी प्रकाशित करण्याच्या बाजूने नसली तरीही अभिव्यक्ती स्वातंत्र्य राखणे महत्त्वाचे आहे.

# अकबरुद्दीन ओवेसींनी मंदिराच्या विकासासाठी मागितला निधी

## मुख्यमंत्र्यांनी लगेच दिले 20 कोटी

हैदराबाद, दि. २१ वृत्तसंस्था
अकबरुद्दीन ओवेसी आणि मंदिर विकासासाठी निधीची मागणी, हे वाचून तुम्हाला थोडं आश्चर्य वाटले असेल. हे खरंय का? असा प्रश्नही तुम्हाला पडला असेल, तर हो, खरं आहे. तेलंगणा विधानसभेत एआयएमआयचे आमदार अकबरुद्दीन ओवेसी यांनी ही मागणी केली. आणि मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनीही लगेच त्यांची मागणी मान्य करत २० कोटी रुपये देणार, अशी घोषणा केली.



आमदार अकबरुद्दीन ओवेसी यांनी हैदराबादमधील लाल दरवाजा सिम्हा वाहिनी श्री महाकाली मंदिराचा विस्तार करण्यासाठी निधी देण्याची मागणी केली.

विधानसभेत बोलताना अकबरुद्दीन ओवेसी म्हणाले, "लाल दरवाजा असलेले शहरातील किती मोठे मंदिर आहे. त्याला आणखी मोठ बनवू शकतो. तेथील लोकांना पर्यायी जागा दिली जाऊ शकते. ते लोक हिंदूच्या हिताच्या गोष्टी करतात आणि मुसलमानांसोबत लढवत राहतात. त्यांनाही आजपर्यंत लाल दरवाजा मंदिरापर्यंत बोलता आलेले नाही. आज बघा त्या मंदिराचं काम आज ईश्वर एका मुसलमानाकडून करून घेत आहे."

अकबरुद्दीन ओवेसी यांनी मंदिर विकासासाठी निधी मागितला. त्यांची मागणी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी लगेच मागणी मान्य केली.

"लाल मंदिरासाठी जी निधीची मागणी केली गेली आहे. त्यासाठी २० कोटी रुपये देण्याची घोषणा मी करतो आणि सामाजिक विकास निधीतून हा पैसा दिला जाईल. लाल दरवाजा मंदिराचा एक इतिहास आहे. तो आम्ही सोडणार नाही. मंदिर बनवण्याची जबाबदारी माझी आहे आणि दर्शन घडवण्याची जबाबदारी तुमची आहे", मुख्यमंत्री रेड्डी म्हणाले.

## महत्त्वाचे

### हरिष चव्हाण यांची नरहरी सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीवर निवड



**सिडको ।** सुवर्णकार समाजाच्या भारतीय नरहरी सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्यपदी नाशिक जिल्हाध्यक्ष हरिष भाऊ चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. ही निवड भारतीय नरहरी सेनेचे संस्थापक अध्यक्ष काकासाहेब बुऱ्हाडे यांच्या आदेशाने, प्रदेश निरीक्षक लंकेश बुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धी प्रमुख सुनीलजी अहिरराव यांच्या घोषणेनुसार करण्यात आली. हरिष भाऊ चव्हाण यांनी सुवर्णकार समाजाच्या एकजुटीसाठी आणि समाजहितासाठी गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली समाजातील विविध उपक्रम राबवण्यात आले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत भारतीय नरहरी सेनेच्या वतीने त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. या निवडीमुळे संपूर्ण नाशिक जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. भविष्यातही समाजासाठी नवे उपक्रम राबवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### बी. जी. वाघ यांच्या पुस्तकाचे आज प्रकाशन

**नाशिक ।** माजी जिल्हाधिकारी बी. जी. वाघ यांनी लिहिलेल्या घटनात्मक मूल्याचा विकास व ऱ्हास या पुस्तकाचे प्रकाशन शनिवार दि. २२ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता मु. शं. औरंगाबादकर हॉल, सार्वजनिक वाचनालय, नाशिक येथे मा. पुखराज बोरा, न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या हस्ते ॲड. जयंत जायभावे, सदस्य, बार कौन्सिल, नवी दिल्ली व ॲड. नितीन ठाकरे, अध्यक्ष, बार कौन्सिल नाशिक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. वाघ यांचे धर्मसत्ता की ज्ञानसत्ता, मानवी संस्कृतीचा अर्थ, एकला चलो रे, तसेच बौद्ध तत्त्वज्ञानावर इंग्रजीत व मराठीत अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. पुस्तक प्रकाशन कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रंथाली प्रकाशन, मुंबई सुरेश हिंगलासपूरकर व ज्योती स्टोअर्स, नासिकचे संचालक वसंत खैरनार माजी जिल्हा अधिकारी विजय पवार यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांना ओळखपत्र बंधनकारक : मडके



**बेलगाव कुऱ्हे ।** केंद्रशासन व महाराष्ट्र शासन याच्या संयुक्त शेतकरी ओळखपत्र योजनेच्या माध्यमातून शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी) शेतकरी बांधवांना बंधनकारक असून, ३१ मार्चपर्यंत जवळच्या सीएससी केंद्रावर जाऊन आपला शेतकरी ओळख क्रमांक लवकरात लवकर तयार करून घ्यावा, असे आवाहन इगतपुरीचे तालुका कृषी अधिकारी रामदास मडके यांनी केले. कृषी विभागाच्या पीएम किसान, पीकविमा महा डीबीटी पोर्टलवरील योजना, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोक्रा) नैसर्गिक अनुदान, पीक कर्ज यासारख्या इतर सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी ॲग्रीस्टेक प्रकल्पांतर्गत शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी) शेतकरी बांधवांना बंधनकारक असून, भारत सरकारद्वारे शेतकरी फार्मर आयडी तयार करण्याचे काम सुरु असून, शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे तालुका कृषीअधिकारी मडके यांनी सांगितले.

### गुढीपाडव्याला श्री दत्त मंदिर भूमिपूजन सोहळा

**नाशिक ।** श्री दत्त मंदिर गोवा सेवा संस्थांच्या वतीने भव्य श्री दत्त मंदिर भूमिपूजन सोहळा गुढीपाडवा रविवार दि. ३० मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता चित्तेगाव चांदोरी शिव रस्ता, चितेगाव फाटा येथे आयोजित करण्यात आला आहे. ब्रह्मलीन श्री १०८ गुरुदेव पीर मंहतयोगी श्री गुरु बद्रीनाथजी महाराज यांचे आशीर्वाद लाभले आहे. कैलास मठ ट्रस्टचे अध्यक्ष व आचार्य महामंडलेश्वर स्वामी संविदानंद सरस्वती, पुणे येथील मठाधिपती महंत योगी शेरनाथजी महाराज, पंजाब येथील पीर महंत लकीनाथजी महाराज, अखिल भारतीय संत समितीचे महाराष्ट्र प्रदेश प्रमुख महंत आचार्य डॉ. अनिकेत शास्त्री महाराज यांच्या हस्ते या दत्त मंदिर सोहळ्याचे भूमिपूजन होणार आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष श्री ज्योतिष विद्यावाचस्पती पुरुषोत्तम जोशी महाराज यांनी दिली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून खा. राजाभाऊ वाजे , आ. दिलीप बनकर , देवळाली व्यापारी बँकेचे चेअरमन दत्ता गायकवाड, आ. राहुल ढिकले, अनिल कदम , माजी आ. योगेश घोलप , माजी नगरसेवक उध्दव निमसे, युवा सेनाचे निशांत अवसरकर, पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज खेडेकर, आदेश कलेक्शनचे संचालक शरद दिंडे आदी उपस्थिती मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याचे पौरहित्य गौतम गोदावरी वेद विद्या मंदिर प्रतिष्ठानचे वेदाचार्य रवींद्र पैठणी गुरुजी करणार आहेत. व्यवस्थापक समाधान थोरात असून संयोजक धोंगडेनगर युवक मित्र मंडळाचे अतुलभाऊ धोंगडे आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष व कार्यक्रमाचे मुख्य आयोजक संस्थापक अध्यक्ष ज्योतिष विद्या वाचस्पती पुरुषोत्तम जोशी महाराज व समाधान थोरात आदींनी केले आहे.

# नाशकात रिक्षाचालकांच्या दबंगगिरीला वेळीच चाप गरजेचा!

## काही अपप्रवृत्तींमुळे सारेच पडताहेत रोषाचे बळी






नाशिक शहरात काही रिक्षाचालकांची दबंगगिरी वाढली असून, सिनेस्टाईल वर्तवणुकीने सामान्य नागरिकांचा रोष वाढला आहे. काही अपप्रवृत्तीच्या रिक्षाचालकांमुळे अवघा रिक्षाचालक वर्ग कुठेतरी या रोषाला बळी पडत आहे. त्यामुळे जनसामान्यांची रिक्षाचालकांप्रती असलेली थोडीबहुत विश्वासाहर्ता संपुष्टात येण्यापूर्वी पोलिसांनी अपप्रवृत्तीला ठेचून काढणे गरजेचे आहे. गेल्या चार आठ दिवसात घडलेल्या घटनांवरून नजर फिरवली असता आपण संस्कृतीप्रिय, सांस्कृतिक, शांत नाशिकमध्येच राहयोय ना! अशी खात्री करण्याची वेळ येऊ पहात आहे.

शालिमार चौकात एका चारचाकीचा धक्का लागल्याच्या कारणावरून संबंधित रिक्षाचालकाने घातलेला गोंधळ लोकांनी पाहिला. त्याच्या मुजोरीचा अनुभव आला. कॉलेज रोडवर घडलेल्या दुसऱ्या घटनेत तर संबंधित रिक्षाचालक हातात कोयता घेऊन चारचाकीचालकाच्या मागे सिनेस्टाईल धावत होता. लोकं सुन्न होऊन हा तमाशा, मुजोरी, दबंगगिरी उघड्या डोळ्यांनी हताशपणे पहात होते. केवढी ही मुजोरी, शिरजोरी, दबंगगिरी... !! या तर प्रत्यक्षदर्शी घडलेल्या दोन तीन घटनांची उदाहरणे आहेत. अप्रत्यक्ष अर्थात पडद्यामागे तर शेकडो घटना घडतात. प्रवाशांशी बोलताना अतिशय सुमार भाषाशैली वापरणे, अश्लील भाषेत संवाद साधणे, शिव्या देत बोलणे, अरेरावी करणे, धक्का बुक्की करणे, वाहनाला रिक्षा आडवी लावणे, लोकांना वेठीस धरणे असले प्रकार तर सर्रास चालतात. अनेक रिक्षाचालक मद्यप्राशन केलेले असतात. त्यामुळे प्रवाशांची कुचंबणा होते. महिला प्रवाशांना असुरक्षित वाटते. अनेक रिक्षाचालक सिटी लिंकच्या बसेसला अडचण निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. बस स्टॉपवरच रिक्षा रस्त्यात उभ्या करतात. त्यामुळे अनेकवेळा बसला खोळंबा होऊन प्रसंगी वाहतूक कोंडीही होते. गर्दीच्या ठिकाणी तर रिक्षाचालक फारच आक्रमक होतात. त्यामुळे अनेकदा प्रवाशी आणि रिक्षाचालक यांच्यात वाद होतात. या प्रकाराला कुठंतरी चाप बसणे आवश्यक आहे अन्यथा अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. रिक्षाचालकांमध्ये गुन्हेगारी वृत्तीची माणसं आल्याने हा व्यवसाय तथा रिक्षाचालक बदनाम झाला आहे, होत आहे. याला जर वेळीच पायबंध घातला गेला नाही तर अनर्थ ओढवण्याची भीती निर्माण झाली आहे. थेट सामान्य जनमाणसांशी रिक्षाचालक मंडळींचा संबंध येतो. त्यामुळे या मंडळींनी नागरिकांशी सौजन्याने वागणे अति आवश्यक आहे; पण प्रत्यक्षात घडते उलटेच! रिक्षा प्रवास ही नागरिकांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे रिक्षाची सेवा पुरवणाऱ्यांनी तितक्याच आत्मियतेने ही सेव उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. नाशिकमध्ये हजारोंच्या संख्येने रिक्षा आहेत. त्यावर लाखो लोकं उदरभरण करतात. समाजाचा ते एक जबाबदार घटक आहेत, याचे त्यांनी भान ठेवायलाच हवे. तरच कुठेतरी विश्वासाहर्ता, सामाजिक एकोपा वाढीस लागेल. काही वाद, भांडण वा एखादा काही प्रसंग उदभवला तर लगेच शेकडो रिक्षाचालक गोळा होतात अन एकीचे दर्शन घडवितात. हरकत नाही! एकी हवीच; पण ती दबंगगिरी, मुजोरीसारख्या ठिकाणी नको! पोलीस प्रशासनाने वेळोवेळी रिक्षाचालक-मालक संघटनांचे प्रतिनिधी, प्रवासी संघटनेचे पदाधिकारी आणि संबंधितांच्या बैठका घेऊन समनव्य घडवून आणायला हवा!

मूठभर अपप्रवृत्तीच्या माणसांमुळे कुठेतरी रिक्षा व्यवसाय आणि रिक्षाचालक टीकेचे, बदनामीचे धनी ठरत आहेत. नागरिक काही सर्वच रिक्षाचालकांना दोषी मानत नाही. अनेक रिक्षाचालक इनामे इतबारे रिक्षा चालावण्याचा व्यवसाय करतात. नागरिकांच्या मदतीला धावून जातात. प्रवाशी रिक्षात वस्तू, सामान विसरले तर शोध घेऊन परत करतात. सामाजिक कार्यात पुढाकार घेतात. अनेक रिक्षाचालकांचे नागरिकांशी सलोख्याचे संबंध असतात. अनेक रिक्षाचालक उच्चशिक्षित आहेत. संस्कृतीप्रिय, संस्कृतीरक्षक आहेत; परंतु यांच्यात घुसलेल्या काही अपप्रवृत्तीच्या माणसांमुळे ही चांगली मंडळीही भरडली जात आहे. ही अपप्रवृत्ती नष्ट करण्यासाठी सजग वृत्तीच्या मंडळींनी आता पुढे यायला हवे अन्यथा या मंडळींच्याही माथी अपप्रवृत्तीचा टिळा लागेल!

### संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पुढे यावे

नाशिक शहरात हजारोंच्या संख्येने रिक्षा आहेत तर लाखाच्या घरात रिक्षाचालक आहेत. रिक्षाचालकांच्या अनेक संघटनाही आहेत. या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना मानणारा रिक्षाचालकांचा वर्गही आहे. त्यामुळे या पदाधिकाऱ्यांनी जर पुढाकार घेतला तर रिक्षाचालक क्षेत्रातील अपप्रवृत्ती, दबंगगिरी, मुजोरी बऱ्याच अंशी कमी होऊ शकेल. रिक्षाचालक- मालक संघटना, पदाधिकाऱ्यांनी रिक्षाचालकांच्या पाठीशी भरभक्कमपणे उभे रहावे; परंतु चुकीच्या बाबतीतही रिक्षाचालकांना वेळोवेळी समज द्यावी, असे समाजातील जेष्ठ मंडळींचे मत असेल तर तेही लक्षात घ्यायला हवे!

## नव तेजस्विनी महोत्सव २०२५ प्रदर्शनाचा समारोप



**नाशिक ।** महिला आर्थिक विकास महामंडळ, नाशिक मार्फत नव तेजस्विनी महोत्सव 2025 अंतर्गत आयोजित महिला बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे तीन दिवसीय विक्री प्रदर्शनाचा समारोप नुकताच झाला, अशी माहिती महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अधिकारी संजय गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

या समोराप कार्यक्रमास स्वामी समर्थ केंद्र दिंडोरीचे आबासाहेब मोरे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक भिवा लवाटे, आयसीआयसीआय बँकेचे विभागीय अधिकारी वैभव भाटिया, नीलेश सपकाळ, बँक ऑफ महाराष्ट्राच्या श्रीमती अनुराधा, कार्यक्रम अधिकारी नीलेश थोरात, लेखाधिकारी नितीन खोडके व महिला बचत गटातील महिला उपस्थित होत्या. महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून आपले व्यवसाय सुरू करावेत तसेच उत्पादित केलेल्या मालाची विक्री व्यवस्थेसाठी उत्पादीत मालाची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवावी, असे मोरे यांनी मार्गदर्शन केले. तसेच व्यवसाय उभारणीसाठी भांडवल उभारणीबाबतची माहिती व योजना याबाबत लवाटे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या थाळी स्पर्धा, सामाजिक विषयावरील रांगोळी स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, गायन, नृत्य स्पर्धांच्या विजेत्यांना पुरस्कार देवून व बचत गटातील स्टॉल धारक महिलांना प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा समन्वयक अधिकारी गायकवाड यांनी केले. अजंली वाढघुले यांनी सुत्रसंचालन केले. तीन दिवसीय प्रदर्शनात उपस्थित सर्व स्टॉलच्या माध्यमातून एकूण ६ लाखापर्यंत विक्री झाली.

## रंगपंचमीनिमित्त ‘रांगोस्तव’ उत्साहात



**सिडको ।** जय श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे रंगपंचमी निमित्त ‘रांगोस्तव’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम राधिका डायनिंग हॉल येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात सुमारे ३०० महिलांनी सहभाग घेतला आणि विविध रंगांनी आनंदोत्सव साजरा केला.

ट्रस्टच्या संस्थापिका जयश्री चौधरी या महिलांसाठी सतत वेगवेगळे उपक्रम राबवून त्यांना स्वतःसाठी आनंदाने जगण्याची संधी उपलब्ध करून देतात. या कार्यक्रमात महिलांनी नृत्य, रंग खेळ, गाणी आणि कलागुण प्रदर्शन यांचा मनमुराद आनंद घेतला. या भव्य उत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी अश्विनी महाले, रुपाली वालझाडे, भावना मावळे, पुष्पा चौधरी, पूनम बर्वे, कविता कुलकर्णी, तृप्ती मालवदे, योगिता बागुल आणि अक्षदा चौधरी यांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रम यशस्वी पार पाडल्याबद्दल जय श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा जयश्री चौधरी यांनी सर्व सहभागी महिलांचे आणि सहकार्य करणाऱ्या टीमचे मनःपूर्वक आभार मानले. भविष्यातही महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना सामाजिक स्तरावर प्रोत्साहन मिळावे यासाठी ट्रस्ट सातत्याने नवनवीन उपक्रम राबवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## मधुमेह, उच्चरक्तदाबामुळे किडनी विकाराच्या समस्यांमध्ये वाढ : डॉ. केळकर

### भारत नगर जेष्ठ नागरिक संघातर्फे व्याख्यान संपन्न



**नाशिक ।** जीवनशैलीचा दैनंदिन जीवनमानावर होणारा बदल तसेच उच्च रक्तदाब आणि मधुमेहामुळे किडनीच्या समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे प्रतिपादन नारायणी हॉस्पीटलचे किडनीविकार तज्ञ देवीकुमार केळकर यांनी केले.

डॉ. देवीकुमार केळकर म्हणाले की, सकाळी उठल्यावर डोळ्याभोवती सुज येणे, चेहरा किंवा पायावर सुज येणे, लघवीमध्ये रक्त किंवा प्रोटीन जाणे, लघवी करतांना त्रास होणे यासारखे लक्षणे दिसल्यास तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या. वेळीच निदान होऊन योग्य उपचार घेतल्यास पुढील आजार टाळता येणे शक्य असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. भारत नगर ज्येष्ठ नागरिक संघ यांच्यातर्फे आयोजित व्याख्यान कार्यक्रमात डॉ.केळकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मंडळाचे अध्यक्ष उत्तमराव कडलग, उपाध्यक्ष आप्पासाहेब जाधव, सुरेश गांगुर्डे, एकनाथ तपकीरे, विष्णू लोहकरे, रामनाथ मोरे उपस्थित होते. डॉ.केळकर म्हणाले की, डायबेटिस होऊ नये असा विचार आपण करत असू तर सर्वांत आधी स्वतःचं निरीक्षण करावं लागेल. आपलं वजन, रक्तातील साखरेची पातळी, जीवनशैली यांचा विचार करणे महत्वाचे आहे. यामध्ये घरामध्ये डायबेटिसने मागच्या पिढ्यांमध्येच प्रवेश केला केला आहे अशा लोकांना डायबेटिसचा धोका जास्त असतो. त्यांनी अधिक काळजी घेणे गरजेचे असल्याचेही डॉ. केळकर यांनी सांगितले. यावेळी मोठ्या संख्येने संचालक व सभासद उपस्थित होते.

# नाशकात नोव्हेंबरमध्ये उद्योजकांचा ‘महाकुंभ’

## ‘आयमा’तर्फे आयोजन । प्रदर्शनाच्या अध्यक्षपदी वरूण तलवार



**नाशिक ।** अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) तर्फे २८ नोव्हेंबर ते १ डिसेम्बर २०२५ दरम्यान त्र्यंबक रोडवरील ठक्कर ग्राउंड मैदानावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे औद्योगिक प्रदर्शन आयमा इंडेक्स-२०२५ (औद्योगिक कुंभमेळा)चे आयोजन करण्यात आले आहे.

देशभरातील उद्योजक तसेच या क्षेत्रात करिअर घडविणाऱ्यांसाठी हे प्रदर्शन पर्वणीच ठरणार आहे. प्रदर्शनात सुमारे ३०५ स्टॉल्स असतील. पैकी ५५ स्टॉल्सचे बुकिंग झाल्याची माहिती आयमाचे चेअरमन ललित बूब यांनी दिली. आयमा इंडेक्स- २०२५ च्या चेअरमनपदी वरुण तलवार यांची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणाही बूब यांनी यावेळी केली. आयमातर्फे २००५ पासून दर तीन वर्षांनी आयमा इंडेक्सचे आयोजन करण्यात येते. यावर्षी भरणारे हे सातवे प्रदर्शन असून, त्यात इंजिनीरिंग, मशीन टूल्स, इलेक्ट्रिकल्स, इलेक्ट्रॉनिक्स, इंस्टुमेशन, इंडस्ट्रियल कंझुमर, टेक्स्टाईल्स, आयटी व ऑफिस ऍटोमेशन, सोलर एनर्जी, बँकिंग ,इन्शुरन् ,फायनान्स ,एज्युकेशन, टुरिझम, फूड प्रॉडक्ट्स आदींचे अद्ययावत स्टॉल्स असतील. वातानुकूलित डोम उभारणीवर आमचा भर राहणार आहे, असे प्रदर्शनाचे चेअरमन वरूण तलवार यांनी सांगितले.

नाविन्यपूर्ण तसेच नवीन तंत्रज्ञानाचे स्टॉल्स हे या प्रदर्शनाचे खास वैशिष्ट्य असेल. नवनवीन आव्हानांना सामोरे जाणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन देणे हासुद्धा प्रदर्शनाचा मुख्य हेतू आहे. नाशकात उद्योगधंद्यांसाठी पोषक वातावरण असून येथे नवनवीन उद्योग यावेत म्हणून त्यांच्यासाठी रेडकार्पेट टाकण्याचे प्रयत्न केले जतील .प्रदर्शनास ४ दिवसांत दीड लाख लोक हजेरी लावतील, असा अंदाज असल्याचे बीओटी चेअरमन ज्ञानेश्वर गोपाळे यांनी नमूद केले. अंबड, सातपूर तसेच जिल्यातील विविध क्षेत्रातील अनेक उद्योजक आपली नावीन्यपूर्ण उत्पादने निर्यात करतात. त्याची ओळख व्हावी, नाशिकचे ब्रॅण्डिंग व्हावे, नाशकात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक यावी यासाठी आयमा- इंडेक्स २०२५ला विशेष महत्त्व असल्याचे,आयमाचे सहसचिव हर्षद बेळे यांनी सांगितले. 2027 मध्ये नाशकात होऊ घातलेल्या कुंभमेळ्याचा दृष्टीनेसुद्धा आयमा इंडेक्सला विशेष विशेष महत्त्व आहे. स्टॉल बुकिंगसाठी मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर, वापी, सुरत, आमदाबाद, वडोदरा, राजकोट तसेच देशाच्या कानाकोपऱ्यातून उद्योजकांचे फोन खणखणत असल्याचेही ते पुढे म्हणाले.

नाशिक डेस्टिनेशन या संकल्पनेतून आयोजित या प्रदर्शनामुळे नाशिक उद्यमनगरीचे नांव केवळ राज्यात आणि देशातच नव्हे तर साता समुद्रापार नेण्याचा आमचा मानस आहे.

उद्योग विश्वाशी संबंधित विविध शासकीय अधिकारी प्रदर्शनात दररोज उपस्थित राहून उद्योजकांशी संवाद साधतील. विविध विषयांवर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी अनेक परस्पर सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्याही होतील, असे आयमाचे उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे आणि उमेश कोठावदे यांनी सांगितले. आभार सरचिटणीस प्रमोद वाघ यांनी मानले. कोषाध्यक्ष गोविंद झा, माजी अध्यक्ष जे.आर. वाघ तसेच कार्यकारिणी सदस्य यावेळी उपस्थित होते.

# स्मशानभूमीतील पाणीपुरवठा बंद; नागरिकांचे प्रशासनाला निवेदन

**सिडको ।** अंबडगाव येथील स्मशानभूमीमध्ये अनेक वर्षांपासून पाणीपुरवठा करणारी पाइपलाइन तुटलेली असून, त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाने लक्ष द्यावे आणि तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

अंबड परीसर, दत्तनगर, घरकुल परीसर आणि आजूबाजूच्या भागातील नागरिक आपल्या नातेवाईकांच्या अंत्यसंस्कारासाठी अंबडगाव येथील स्मशानभूमीचा वापर करतात. मात्र, तुटलेल्या पाईपलाइनमुळे स्मशानभूमीमध्ये पाणी उपलब्ध नाही. परिणामी, अंत्यसंस्कार विधी पूर्ण करण्यासाठी नागरिकांना दूरवरून पाणी आणावे लागते. विशेषतः, मृत व्यक्तीला शेवटचे पाणी पाजण्यासाठी आणि अंत्यसंस्कारानंतर राखेचा विधी पार पाडण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. मात्र, सध्या ही गरज भागवण्यासाठी नागरिकांना शेजारील सुलभ शौचालयातून किंवा इतरत्रून पाणी वाहून आणावे लागत आहे. हे अत्यंत अपमानास्पद असून, प्रशासनाच्या हलगर्जीपणाचे प्रतीक आहे, अशी भावना नागरिकांमध्ये आहे. या परिस्थितीमुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या लोकांची मोठी गैरसोय होत आहे. यासोबतच, पाण्याअभावी स्मशानभूमी अस्वच्छ राहते, ज्यामुळे आरोग्यविषयक समस्याही निर्माण होण्याची शक्यता आहे. स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी प्रशासनाकडे तक्रार केली असली तरी अद्याप या समस्येचे निराकरण झालेले नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. नागरिकांनीही प्रशासनाला लवकरात लवकर या समस्येचे निराकरण करण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा, अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी लवकरच तीव्र आंदोलन छेडले जाईल, असे संकेत स्थानिक सामाजिक संघटनांनी दिले आहेत.






**“स्मशानभूमी ही शेवटच्या प्रवासाची जागा आहे. येथे पाणीपुरवठा नसणे ही लाजिरवाणी गोष्ट आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन तुटलेली पाइपलाइन दुरुस्त करावी, अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल.**
**– शरद दातीर,**
**शिवसेना शाखा प्रमुख अंबड**

# ईएसआय हॉस्पिटलमध्ये लवकरच अत्याधुनिक यंत्रसामग्री, उपकरणांची होणार उपलब्धता

**• आयसीयू, स्वतंत्र प्रसूती कक्षाची होणार निर्मिती**
**• आ. सिमा हिरेंना विमा कामगार महामंडळाच्या आयुक्तांची ग्वाही**

**सातपूर ।** डागडुगी तसेच अपुऱ्या आणि दर्जदार मनुष्य बळाचा अभाव,साधनसामुग्रीची कमतरता यामुळे ईएसआय हॉस्पीटलला अवकळा आली आहे. हॉस्पीटलला उर्जितावस्थेत आणण्यासाठी आज आमदार सिमाताई हिरे यांनी विमा कामगार कॉर्पोरेशनचे अध्यक्ष अस्तिककुमार पांडे यांची भेट घेत दुरुस्ती,रंगरगोटी आणि साधनसामुग्रीच्या उपलब्धेते विषयी प्रस्ताव सादर केले. आ. हिरेंनी कामगारांच्या हितापोटी पोटतिडकीने मांडलेले मुद्दे पांडे यांना चांगलेच भावले.लवकरच अत्याधुनिक साधनसामुग्री उपलब्ध करून देण्यात येणार असून येत्या दोन,तिन महिन्यात आयसीयू आणि महिला प्रसूती कक्ष सुरू करण्यात येणार असल्याची ग्वाही पांडे यांनी हिरेंना दिली आहे.

औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी पस्तीस वर्षांपूर्वी सातपूर येथे शंभर खाटांच्या ईएसआय रुग्णालयाची उभारणी करण्यात आलेली आहे. उभारणीच्या सुरुवातीला सुमारे दहा हजारच पॉलिसीधारक कामगार होते.आता मात्र या संख्येत प्रंचड मोठी वाढ झाली असून आजमितीस पॉलिसीधारकांची संख्या तिन लाखांच्या घरात गेली आहे.असे असले तरी वेळोवेळी रुग्णालयाची डागडुगी, रंगरंगोटी न केल्याने इमारती जीर्ण झाल्या आहेत. तसेच आधुनिक उपकरणे,साधन -सामुग्री उपलब्ध न करुन दिल्याने हॉस्पीतलला घरघर लागली आहे.



यातून कामगारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.हॉस्पीटलला उर्जितावस्थेत आणण्यासाठी आज आ.हिरे यांनी विमा कामगार महामंडळाचे आयुक्त अस्तीकुमार पांडे यांची मुंबईत भेट घेतली. दुरुस्ती, रंगरगोटी आणि साधनसामुग्रीच्या उपलब्धेते विषयी तसेच हॉस्पीटलच्या दुरावस्थेविषयी आ.हिरे यांनी पांडे यांच्याशी अर्धा तास सविस्तर चर्चा केली.अद्यावत उपकरणे तसेच साधन -सामुग्री उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी यावेळी आ.हिरेंनी केली. लवकरच अत्याधुनिक साधन सामुग्री उपलब्ध करून देण्यात येणार असून येत्या दोन -तिन महिन्यात आयसीयू आणि महिलासाठी प्रसूती कक्षही सुरू करण्यात येणार असल्याची ग्वाही पांडे यांनी हिरेंना दिली आहे.

## ➢ महत्त्वाचे

### लासलगाव बस डेपोत पुन्हा पाच नवीन बसेस दाखल

**नाशिक ।** माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांमुळे गेल्या आठवड्यात लासलगाव बस डेपोमध्ये ५ नवीन बसेस दाखल झाल्या आहे. त्यानंतर आज पुन्हा ५ नवीन बसेस लासलगाव डेपोमध्ये दाखल झाल्या आहेत. प्रवाश्यांचा प्रवास होणार अधिक सुखकर होणार आहे. भुजबळ यांनी २५ बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी परिवहन मंत्र्यांकडे केली आहे. त्यानुसार लासलगाव बस डेपोला टप्याटप्प्याने अधिक बसेस लवकरच उपलब्ध होणार आहे. भुजबळ यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे राज्य परिवहन येवला व लासलगाव आगारास नवीन बसेस देण्याची मागणी केली होती. त्यानुसार लासलगाव बस डेपोला आत्तापर्यंत एकुण १० बसेस प्राप्त झाल्या आहे. येवला मतदारसंघातील राज्य परिवहन विभागाच्या लासलगाव आगारात ५६ पैकी २२ बसेस नादुरुस्त झाल्या असून, केवळ ३४ बसेस सेवेत होत्या. लासलगाव व येवला डेपोला तात्काळ बसेस किमान प्रत्येकी २५ बसेस उपलब्ध करून द्यावे अशी मागणी भुजबळ यांनी केली होती. त्यानुसार पहिल्या टप्प्यात १० बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहे.

### कमलावती कोठारी शाळेत कोरडी रंगपंचमी

**एकलहरे ।** नैसर्गिक रंगांची रंगपंचमी या उपक्रम राबवित मुख्याध्यापिका डॉ. लक्ष्मी कस्तुरे यांनी पाण्याचा वापर न करता नैसर्गिक कोरड्या रंगांचा वापर करून पाणी बचतीचा संदेश दिला.



'रासायनिक रंगांचा दुष्परिणाम' याविषयी तनुष्का तेलंगी हिने माहिती सांगितली. स्वरा लोखंडे हिने पाण्याचा थेंबाचे प्रतीक बनून 'रंगपंचमीला पाण्याचा वापर न करता नैसर्गिक रंगांचा वापर करा' असे सांगितले. झेंडू, गुलाब, झाडाची पाने, बीट ,हळद व पालक यांचा वापर करून इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनींनी नैसर्गिक रंग तयार केले होते. त्या रंगांचा वापर करून शिशुवृंद व इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थिनींनी रंगपंचमी खेळली. यात मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सर्वांनी रंग पंचमीचा आनंद लुटला.यावेळी सुनीता सोनगिरे सुरेखा पाटील मानसी झनकर, प्रणाली अहिरे, योगेश चौरे, स्नेहल बोरसे, निर्मला दिवेकर, अरुण काळे उपस्थित होते.

### रविवारी ‘सुहाना सफर’ विनामूल्य मैफल

**नाशिक ।** अफलातून म्युझिक लव्हर्स ग्रुपतर्फे सुहाना सफर (भाग ५) हा जुन्या हिंदी गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रविवार दि. २३ मार्च रोजी संध्याकाळी ६ वाजता परशुराम सायखेडकर नाट्यगृह येथे ही विनामूल्य मैफल होईल. नाशिक मधील ६ सुप्रसिद्ध गायिका माधवी भसे, सुगंधा शेलार, सविता खोडके, प्रज्ञा गोपाले,संगीता दुसाने, पल्लवी पगारे तसेच नाशिक मधील ७ सुमधुर गायक गोविंदभाई चंदे, मनोज दीक्षित, राजेश अक्कर, मधुकर नाठे, विवेक फुटाणे, संजोग टिपरे, मंगेश खोत हे सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर नाशिक मधील सुप्रसिद्ध निवेदक समीर देसाई यांच्या खुमासदार व अभ्यासपूर्ण निवेदनामध्ये अनेक जुन्या आठवणींना उजाळा देण्यात येईल. कार्यक्रमाची संकल्पना अफलातून ग्रुपचे अध्यक्ष हरीष ठक्कर यांची आहे. या कार्यक्रमासाठी प्रवेश व पार्किंग विनामूल्य आहे. रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# गोदाजलाची फेर तपासणी करून अहवाल द्यावा

**प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे काँग्रेस सेवा दलाची मागणी**

**नाशिक ।** प्रदूषण नियंत्रण महामंडळाने गंगा गोदावरी पाण्याचा सादर केलेला अहवाल संशयास्पद वाटत आहे. त्यामुळे सद्यस्थितीत गंगा गोदावरीचे पाणी घेऊन त्याचा अहवाल नाशिककरांसमोर सादर करावा, अशी मागणी नाशिक शहर काँग्रेस सेवा दलाने प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महामंडळाने जानेवारी ते डिसेंबर 2024 चा गोदावरीचा पाण्याचा अहवाल नुकताच सादर केला आहे. त्यामध्ये पाणी पिण्यायोग्य असल्याचे म्हटले आहे; परंतु ज्या ठिकाणी पाण्याचे नमुने प्रदूषण नियंत्रण महामंडळाने घेतले आणि ते तपासले तेथील परिस्थिती पाहता खरंच नमुने घेऊन पाणी तपासणी केली का हा प्रश्न आहे. गोवर्धन गाव ते ओढ्यापर्यंत मनपा हद्दीत मनपाने अनेक ड्रेनेज लाईन गोदावरीला जोडल्या आहेत. त्यामुळे महामंडळाने मनपाला कायदेशीर नोटीस देऊन दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित असताना तसे काही झालेले दिसत नाही. त्यामुळे महामंडळाने नेमक्या कुठल्या पाण्याचे नमुने घेऊन तपासले याचा खुलासा करावा, असेही निवेदनात म्हटले आहे.

यावेळी काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष आकाश छाजेड, शहर काँग्रेस सेवा दल शहराध्यक्ष डॉ. वसंत ठाकूर, विजय पाटील, गौरव सोनार, संतोष हिवाळे संदीप वाघ, इमरान अन्सारी, शेबाज मिर्झा, सिद्धार्थ गांगुर्डे, अशोक लहामगे, अरुण जाधव, उमेश चव्हाण आदी उपस्थित होते.

# प्रगल्भ विचाराचा मनुष्य उपभोगतो आनंद

**गंगाधर महाराज कवडे ; श्री वरद विनायक मंदिरात हरिनाम सप्ताह**

**नाशिक ।** संसारामध्ये संस्कार आहे, स्वत:साठीच न जगता समाजहित ज्यांच्या विचारात आहेत अशा प्रगल्भ विचाराचा मनुष्य संसारात केवळ आनंदच उपभोगतो. स्वच्छ दृष्टिकोन ठेऊन केलेले विधायक कार्य हे सामाजिक कार्य असून, ती एकप्रकारे तपसाधना आहे. मनुष्याने आत्मकेंद्रित न राहता समाजकेंद्रीत राहिले पाहिजे असे विचार शब्दप्रभू गंगाधर महाराज कवडे यांनी व्यक्त केले.

हिरावाडी येथील वरद विनायक मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त वै. ह भ प श्री रामनाथ महाराज शिलापूरकर यांच्या प्रेरणेने व मधू सुर्यवंशी, एकनाथ सांगळे यांच्या कुशल मार्गदर्शनाने सुरू असलेल्या नाम सप्ताहातील कीर्तनात सारासार विचार करा. "उठा उठी नाम धरा कंठी विठोबाचे" या अभंगावर ते बोलत होते. महाराज म्हणाले की, सारासार विचार जीवनात असावा. सृष्टीचक्र हे एकमेकावर आधारलेले म्हणजेच प्रत्येकाचे जीवन एकमेकांवर आधारलेले आहे. जगामध्ये आपले काही नसून श्वास सुद्धा आपला नाही हे समजने हा ही सारासार विचार आहे. मनुष्य हा समग्र सृष्टीचा मुकुटमनी आहे किंबहुना मनुष्या शिवाय सृष्टीला शोभा नसल्याचे कवडे महाराज यांनी सांगितले.



**नीट आणि धीट राहण्याची शिकवण**

समाजहिताला जिथे बाधा पोहचत असेल अशा प्रसंगानुरूप जो माघार घेतो तो मनुष्य शहाणा असतो असेही कवडे महाराज म्हणाले. वारकरी सांप्रदाय मनुष्याला नीट आणि धीट राहण्याचे शिकवतो. दुसऱ्याच्या मनाला छिन्न विछिन्न करणे, आपमनित करणे ही मानसिक हिंसा आहे म्हणून असे महापातक आपल्या हातुन घडु नये, आपण शरीराच्या गावाला आलो आहोत फार काळ आपले अस्तित्व या पृथ्वीतलावर नाही या विचाराने जीवन व्यतीत केले पाहिजे,असे अनेक दाखले देत महाराजांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या प्रसंगी ह.भ.प. एकनाथ कुमावत गुरुजी, फौजी महाराज सूर्यवंशी, सुरेश महाराज मगर, कैलास महाराज वेलजाळी, दादाजी अहिरे गोरख सूर्यवंशी, बाळा (संदीप) जाधव, रामदास श्रीशेठ, जगतगुरु तुकाराम महाराज गुरूकुलाचे विदयार्थी व वारकरी बांधव उपस्थित होते. उर्वरित नाम सप्ताह सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एकनाथ महाराज सांगळे, मधुकर सूर्यवंशी, विष्णू कुडके, विजू मोरे, किशोर खैरनार, नितीन मोरे ज्ञानेश्वर पवार, सागर नाईक यांनी केले आहे.

# स्वच्छ, हरित कुंभसाठी सर्व घटकांनी योगदान द्यावे : डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज

**श्री जनेश्वर महादेव मंदिर वर्धापन दिनानिमित्त प्रवचन**

**नाशिक ।** देशामध्ये हरिद्वार, उज्जैन, नाशिक व प्रयागराज या चार ठिकाणी मुख्य कुंभमेळा भरत असतो. नाशिक कुभनगरी म्हणून जगाचा पाहण्याचा दृष्टिकोन एक वेगळा आहे. स्वच्छ, हरित कुंभसाठी सर्व घटकांनी योगदान द्यावे, असे आवाहन संत साहित्याचे अभ्यासक, श्री सिद्धी विनायक मानव कल्याण मिशनचे अध्यक्ष डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांनी केले.

पंचवटीतील मखमलाबाद येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी नगर मधील जनेश्वर महादेव मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त प्रवचन मालेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याप्रसंगी डॉ. गुट्टे महाराज बोलत होते. लक्ष्मी लॉन्सचे संचालक संदीप काकड, शरद काकड, प्रवीण काकड, अहिरे सर, बबन खाडे व परिसरातील सर्वांच्या सहकार्यातून हे मंदिर निर्माण झाले आहे. कमलेश बोडके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. गुट्टे महाराज म्हणाले की, वारकरी संप्रदायाच्या आद्य गुरु म्हणून भगवान शंकराकडे पाहिले जाते. पहिले वारकरी म्हणून भगवान शिव यांना ओळखले जाते. आदिनाथ उमा बीज प्रगटले, मच्छिंद्र लागले सहजसिद्धी या न्यायाप्रमाणे किंवा अभंगाप्रमाणे भगवान शिव हे वारकरी संप्रदायाचाआद्य दैवत मानले जाते. स्वामी निवृत्तीनाथ महाराज हे भगवान शंकराचा अवतार असून, आपल्या पंचक्रोशीतच स्वामी निवृत्तीनाथ महाराज यांची समाधी आहे. पंचवटी सारख्या महान क्षेत्रामध्ये जनेश्वर महादेवाचे मंदिर निर्माण होणे ही भक्तांसाठीची मोठी पर्वणी आहे. येणाऱ्या कुंभमेळ्यामध्ये स्वच्छ कुंभमेळा हरित कुंभमेळा निर्माण झाला पाहिजे. ऐतिहासिक प्राचीन असे व मंदिराचे शहर म्हणून नाशिक नगरीची ओळख असल्याचेही डॉ. गुट्टे महाराज यांनी सांगितले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.



# कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे शिक्षण उपसंचालकांना निवेदन



**नाशिक ।** सन २००५ पूर्वीचे अर्धवेळ शिक्षक यांनाही जुनी पेन्शन योजना लागू करावी, आयटी शिक्षकांना सामावून घ्यावे, इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया रद्द करावी, 10 20 30 ही व आश्वासित प्रगती योजना लागू करावी, प्रचलित धोरणानुसार टप्पावाढ अनुदान जाहीर करावे आदी प्रमुख मागण्यांसंदर्भात सोमवारी (दि.१७) कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष डॉ. एस. के. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक जिल्ह्यात आंदोलन करण्यात आले.

महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयात जाऊन शिक्षकांच्या समस्यांकडे लक्ष वेधत शिक्षण उपसंचालक बी. बी. चव्हाण यांना निवेदन दिले. जिल्हाभरातून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक यावेळी उपस्थित होते. निवेदनावर महासंघाचे अजय पानसरे, सतीश गायकवाड, विनोद चव्हाण, भरत डुंबरे, अनिल गवळी, दीपक घेगडमल, प्रविण निकम, माधवी भोसले, भारती पाटील, मानसी डावरे, शिल्पा देशमुख, निर्मला जाधव, वृषाली घुमरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नाशिक कृउबा समितीच्या सभापतिपदी कल्पना चुंबळे

**नाशिक ।** अखेर नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतिपदावर शिवाजी चुंबळे गटाने वर्चस्व सिद्ध केले. सभापतिपदी चुंबळे गटाच्या कल्पना चुंबळे यांची एकमताने निवड झाली.

वादग्रस्त होऊन पायउतार झालेल्या माजी सभापती देवीदास पिंगळे यांच्यावर दाखल झालेला अविश्वास ठराव १५ विरुद्ध ० ने मंजूर झाल्यानंतर बुधवारी (दि. १९) नवीन सभापती निवडीसाठी निवडणूक पार पडली. यावेळी सभापततिपदी कल्पना चुंभळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सभापतिपदासाठी माजी सभापती शिवाजी चुंभळे आणि कल्पना चुंभळे यांच्या नावांची जोरदार चर्चा सुरू होती. अखेर सभापतिपदी कल्पना चुंभळे यांची बिनविरोध निवड झाली. देवीदास पिंगळे यांच्या मनमानी कारभाराला विरोध करत संचालकांनी एकत्र येत त्यांच्याविरोधात अविश्वास ठराव दाखल केला होता. पिंगळे यांच्या गटातीलच जवळपास सर्वच नाराज संचालक माजी सभापती शिवाजी चुंभळे यांच्या नेतृत्वाखाली आले आणि नव्या समीकरणांची जुळवाजुळव सुरू झाली. याचा परिणाम म्हणून पिंगळे यांच्याविरोधात विशेष सभेत ठराव मांडण्यात आला, जो १५ विरुद्ध ० अशा एकतर्फी मतांनी मंजूर झाला. या घडामोडींमध्ये काही संचालक सहलीवर गेले होते, मात्र मंगळवारी (दि. १८) दुपारी हे संचालक नाशिकमध्ये परतले होते. त्यानंतर सकाळी ११ वाजता थेट बाजार समितीच्या प्रशासकीय इमारतीत दाखल झाले. यानंतर सभापतीपदासाठी अर्ज मागविण्यात आले असता कल्पना चुंभळे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची सभापतिपदी निवड करण्यात आली.







prit00786@gmail.com






















# शब्दकोडे क्रमांक २०६३



**आडवे शब्द :-**
१) मोरपिसाचा मुकुट घालून पहाटे देवाची गाणी म्हणत फिरणारा
५) पेशवाईतील आनंदीबाईंचा गारद्यांना दिलेले निरोप
९) त्रासलेला
१०) लक्ष्मी नारायण
१३) वर्तन
१४) तात्काळ मिळणारी लोकप्रियता
१५) दैव
१७) बेचव
१८) काड्यांची केरसुणी
१९) भांडणे लावणे
२०) प्रयत्न
२२) ढग, लवकर
२३) दृष्टी
२६) बारा वर्षांचा काळ
२८) गाय
३०) तलवारीचे म्यान
३१) नवरदेव
३३) (संधी) घालविणे, पिटाळणे
३५) शाळेतील बसण्याचे साधन
३६) मधुमक्षिका
३७) पत्र
३८) एक जुणी लेखणी
३९) जिम्मेदार
४०) एक चतुर्थांश
४१) त्वचारोग
४२) मुकुटमणी
४५) ठार मारण्यास योग्य
४७) वाहणारी हवा
४८) मर्कट
५१) जावळा
५२) समोरासमोरची छोटी लढाई
५४) निर्धन मनुष्य
५७) लेखणी
५९) अग्नी
६१) गवताचे पान
६३) भ्रंश, भ्रम
६४) कोवळ्या दुधाचा पदार्थ
६६) प्रभात
६७) एक जंगली फूल
६९) पावसाची झड
७०) मोठा भाऊ गल्लीतील गुंड
७१) धावणे
७२) घरगुती थंड पेय

**उभे शब्द :-**
१) चावट
२) मंद, आळसावलेला
३) पाटाचा जोडीदार
४) फिकीर
५) नवरा
६) आईची बहीण
७) धपाटा
८) धनी
११) धागे विणून कापड तयार करण्याचे साधन
१२) आभाराचा एक शब्द
१३) हलकी थप्पड
१४) वाकबगार पटाईत
१५) नूतन
१६) ऐतिहासिक गद्य लिखाण
१७) जोराचा शिडकावा, हबका
१९) गर्द लाल रंग
२१) किंचित कडू चव
२४) चकचकीत
२५) छोटी घागर
२७) गीत
२९) एकरूप तल्लिन,
३२) सपाटून
३४) कमीशन, व्यापारी बट्टा
३५) वडिलांचे मराठी संबोधन
३९) हिशेबाची एक बाजू
४०) चरण
४१) पोथीचे परत परत वाचन
४३) दागदागिने
४४) जनन
४५) यज्ञ
४६) ढग
४८) धनी
४९) अन्न घशाशी येणे, ढवळणे
५०) मोठे पसरट खोलगट ताट
५३) विळखा
५५) एक शेंगभाजी
५६) अनुत्तीर्ण
५८) मुरगळणे
६०) व्यायाम
६२) गुरांचा घोळका
६४) व्यय
६५) बारा महिन्याचा काळ
६६) सदोदित
६८) द्रवपदार्थ
६९) हिंदीत सर्व

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | स्त | मा | न | | अ | न | भि | ज्ञ | | बै | | भा | च | र |
| र | व | र | व | णे | | म | ल्ल | | वा | ल | थ | र | | ण |
| ण्य | | हा | ल | | म | ना | | पा | या | | डी | | आं | बा |
| वा | र | ण | | क | म | ला | क | र | | सा | स | रा | | व |
| स | वा | | पा | | | घ | ळ | | क | म | ला | | क | रा |
| | ना | ग | डा | उ | घ | डा | | पा | ट | | व | स्ता | द | |
| आ | | ज | व | | न | भ | स्क | ल | | गा | णे | | र | स्सी |
| क | च | रा | | वा | | र | | व | ल | य | | यं | दा | |
| स | रा | | मु | | पा | ते | रा | | व | रा | त | | न | वा |
| | च | र्म | का | र | | ल | वा | द | | न | ड | गी | | स |
| स | र | | द | स | रा | | चा | | हो | | का | र | खा | ना |
| म | | स | म | र | | आ | रं | भ | | मा | फ | | ज | |
| र | य | त | | शी | र | | क | | स | व | ड | | रा | त |
| स | | त | ह | त | | स | हो | द | र | | की | र | | या |
| ता | टी | | त्या | | प | ड | णे | | डा | का | | सा | क्ष | र |

# पिंपळगाव बसवंत येथे आगीचे तांडव; लाखोंची हानी











(सुरेश गांगुर्डे यांजकडून)

पिंपळगाव बसवंत येथील बाबा मंगल कार्यालयाजवळील बांबूच्या दुकानासह शेजारील इतर दुकानांना लागलेल्या भीषण आगीत व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले. पिंपळगावसह इतर ठिकाणच्या १० ते १२ अग्निशमन दलाच्या बंबांनी तब्बल ६ ते ७ तास शर्थीचे प्रयत्न केल्याने आग आटोक्यात आली. शॉक सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या अग्नीच्या तांडवात जिवीतहानी टळली असली तरी मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाल्याची चर्चा आहे. सदर घटनेची पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, अधिक तपास पोलीस करत आहेत.

सकाळी साधारणपणे ११ वाजेच्या दरम्यान ही आग लागली. बाबा मंगल कार्यालय परिसरातील बांबूचे दुकान, भत्ताचे दुकान, बॅटरीचे दुकान, पॅकिंग मटेरियलचे दुकान, पुठ्ठा कारखाना, बलेट पेपर दुकान लाकडी, पत्रावळी-ग्लास वगरेचे दुकान, फोटो फ्रेमचे दुकान, कृषी ॲग्रोचे दुकान, कांद्याचे शेड तसेच इतर छोटी मोठी दुकाने आणि पत्र्याच्या शेडला या आगीने वेढल्याने ही सारी दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. त्यामुळे स्थावर मालमत्तेचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. आग झपाट्याने पसरत असल्याने परिस्थिती गंभीर झाली होती. आगीचे वृत्त कळताच पोलीस यंत्रणेसह संबंधित शासकीय यंत्रणा आणि अधिकारी घटनास्थळी पोहोचले. पिंपळगाव बसवंत येथील अग्निशमन दलाचा बंबासह ओझर नगर परिषद, एअर फोर्स, एचएएल, नाशिक महापालिका, येवला, निफाड, दिंडोरी, पिंपळगाव बसवंत टोल नाका, चांदवड आदी अग्नी दलाचे बंब तातडीने दाखल झाले. प्रयत्नांची शर्थ करीत आग नियंत्रित करण्यात आली. तब्बल ६ ते ७ तास आगीचे तांडव सुरू होते. घटनास्थळी बघ्यांची प्रचंड गर्दी झाली होती. स्थानिक नागरिकांनी तसेच विविध क्षेत्रातील मंडळी, सामाजिक संस्था, मंडळे आदींनी सहकार्य केले. या आगीत १२ कामगारांची पत्र्याची शेड वजा घरे जळून खाक झाली. मंदाकिनी गोसावी, पंडित जाधव, रमेश पूरकर, सुरेश यादव, प्रसाद कुंभरकिरण पगार हरुन रहमान मुलाखान, सुजान खान, प्रसाद महाराज कश्यप आदींसह अनेकांचे आगीत नुकसान झाले. या आगीत झालेल्या वित्तहानीचा आकडा कोट्यवधीपर्यंत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# धरणातील गाळ काढल्याने 'गाळ मुक्त धरण, गाळ युक्त शिवार' उपक्रमाचा लाभ



**नाशिक ।** महाराष्ट्र राज्यात देशातील जास्त धरणे व त्यामुळे निर्माण झालेले पाणीसाठे याचा लाभ जनतेला सिंचन व बिगर सिंचनासाठी होत असून त्यामुळे विकासाला मोठ्या प्रमाणावर हातभार लागत आहे. या धरणांमध्ये दरवर्षी साठत असलेल्या गाळामुळे प्रत्येक धरणाची साठवण क्षमता कमी होत आहे. या गोष्टीचा शासनाने गंभीर्याने विचार करून गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही अभिनव योजना सन २०१७ पासून सुरू केली आहे.

या योजनेअंतर्गत धरणात साठलेला गाळ काढून पाणी साठ्यात झालेली घट भरून काढणे व तो गाळ परिसरातील शेतकऱ्यांना शेतीत पसरून त्याची शेतीची सुपीकता वाढवणे, त्याद्वारे शेतकरी वर्गाचे व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे असा दुहेरी हेतू आहे. महाराष्ट्र राज्यात पाण्याचे योग्य वाटप व साठवण यासाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राज्य शासनाने 'गाळमुक्तधरण व गाळयुक्त शिवार' ही महत्वाकांक्षी योजना सन २०१७ पासून सुरू केली. या योजनेंतर्गत नाशिक जिल्ह्यातील धरणगाठी गावाने पाणीसाठ्याची कमतरता भरून काढत गावाच्या पारंपरिक संपन्नतेत मोठी भर घातली आहे. गावाच्या विकासासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार उपक्रम यशस्वी ठरत आहे. या योजनेंतर्गत गावातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी जलसाठ्यांची निर्मिती करण्यात आली. यामुळे शेतीसाठी पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होऊन उत्पादनात वाढ झाली आहे. तसेच गावातल्या शेतकऱ्यांची आर्थिक समृद्धी वाढण्यास मदत झाली आहे. सन २०२३ पासून शासनाने ही योजना व्यापक स्वरूपात राबविण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, जलसंपदा विभाग, स्थानिक संस्था, उद्योजक, व्यापारी तसेच बँकिंग क्षेत्राचा सहभाग घेतला आहे. यामुळे जलसाठ्याच्या दृष्टीने महत्वाची कामे मार्गी लागली आहेत.

### स्थानिक संस्थांनी उचलला मोलाचा वाटा

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी भारतीय जैन संघटना, नाशिक मानवसेवा फाउंडेशन, आर्ट ऑफ लिविंग, समृद्ध नाशिक फाउंडेशन, क्रेडाई ,साने गुरुजी संस्था, नाशिक मेट्रो, सकाळ सोशल फाउंडेशन आणि विविध स्थानिक संस्था यांनी मोलाचा वाटा उचलला आहे. शासनाने नाशिक पाठबंधारे विभागाच्या सहकार्याने गंगापूर, दारणा, वळण, करंजगाव, भोजापुर मध्यम प्रकल्प, काश्यपी मध्यम प्रकल्प, दरसवाडी, कडवा सर, रामशेज, एकलहरे, धाउर करंजगावपाडा या धरणांतर्गत गावांना 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' योजनेचा लाभ मिळावा यासाठी पुढाकार घेतला आहे. या योजनेत नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा , तत्कालीन जिल्हा जलसंधारण अधिकारी हरिभाऊ गीते, नाशिक पाटबंधारे विभागाच्या अभियंता सोनल शहाणे, कृषी विभागाचे अधिकारी तसेच अनेक तज्ञ व्यक्तींचा मोलाचा सहभाग राहिला आहे. सन २०२५ च्या पावसाळ्यापूर्वी गावांमध्ये जलसंधारणाची कामे अधिकाधिक पूर्ण करण्याच्या दृष्टीने ग्रामस्थ, सामाजिक संस्था व प्रशासन संपूर्ण ताकदीने कार्यरत आहे.

# एसटी बंद पडल्यास कोणत्याही श्रेणीच्या बसमधून त्याच तिकीटावर प्रवास!



**नाशिक ।** एसटी महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी आहे. आता एखादी बस बंद पडल्यास महामंडळाच्या कोणत्याही बसेस मधून त्याच तिकीटावर उर्वरित प्रवास पूर्ण करता येणार आहे.

एसटी प्रवास करताना काही वेळा तांत्रिक कारणाने बसेस बंद पडत असतात. अशा वेळी त्याच मार्गावरुन येणाऱ्या बसेसमधून प्रवास करण्याची मूभा असते. परंतू अनेकदा त्याच मार्गावर उच्च श्रेणीची बस आल्यास तिकीटाचा फरक वसुल केला जात होता. आता येथून पुढे बस वाटेत बंद झाल्यास, पुढील बस उच्च श्रेणीची असली तरी तिकीटाचा फरक आकारण्यात येणार नाही. त्याच तिकीटावर एसटीतून प्रवास करायला मिळणार आहे. एसटी महामंडळाच्या एसटीतून प्रवास करताना काही तांत्रिक कारणाने बसेस वाटेत बंद पडण्याच्या घटना घडत असतात. अशा बसेसमधील प्रवासी त्याच मार्गावरुन येणाऱ्या दुसऱ्या बसची वाट पाहातात. काही वेळा तर साधी बस बंद पडली असली. आणि त्याच वेळी त्याच मार्गावर उच्च श्रेणीची पुढील बस आली तर प्रवाशांकडून तिकीटाचा फरक वसुल केला जात असे. मात्र, आता अशा प्रकारे फरक वसुल करु नये, असे आदेश महामंडळाने जारी केले आहेत. त्यामुळे एसटीची साधी बस असली तरी ती बंद पडल्यास पुढील बस उच्च श्रेणीची असली तरी त्याच तिकीटावर प्रवास करता येणार आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस काही कारणाने बिघाडल्यास किंवा अपघात झाल्याने बंद पडल्यास प्रवाशांचा नाहक खोळंबा होत असतो. अशावेळी प्रवाशांना त्रास होऊ नये म्हणून त्याच मार्गावरील महामंडळाच्या पुढील बसणे प्रवास करण्याची अनुमती दिलेली आहे; परंतु ही बस उच्च श्रेणीची असली तरी आता त्यातून त्याच तिकीटात प्रवास करता येणार आहे. उच्च श्रेणीच्या बसेसमधून प्रवास करताना तिकीट भाड्याचा फरक वसुल करु नये, असे आदेश एसटी महामंडळाने जारी केले आहे.

# महावितरणच्या प्रशासकीय इमारतीच्या छतावरील सौर ऊर्जा प्रणालीचे उद्घाटन

**नाशिक ।** महावितरणच्या प्रकाशगड मुख्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या छतावरील सौर ऊर्जा प्रणालीचे उद्घाटन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. महावितरणचे प्रकाशगड मुख्यालय हे आता सौरऊर्जेव्दारे प्रकाशमान झाले आहे. प्रकाशगड मुख्यालयाची दैनंदिन विजेची गरज भागविण्यासाठी २८० किलो वॅट क्षमतेची सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यात आली आहे.

महावितरणकडून पर्यावरणपूरक सौर ऊर्जेच्या वापरास प्रोत्साहन दिले जात आहे. शेती सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध व्हावी याकरिता मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबविण्यात येत आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेतून शेतकऱ्यांना मोफत विजेसाठी सौर कृषी पंप उपलब्ध करून देण्यात येत आहेत. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून घरगुती ग्राहकांना घराच्या छतावर सौर प्रकल्प उभारून विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे. राज्यातील १०० गावे सौरग्राम अर्थात १००% सौर उर्जेवर आणण्यासाठी सौरग्राम योजना राबविण्यात येत आहे. एकंदरीत हरित ऊर्जेचा वापर वाढविण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून चालना देण्यात येत आहे. महावितरणच्या प्रकाशगड मुख्यालयाच्या छतावरील सौर ऊर्जा प्रणालीच्या उद्घाटनप्रसंगी संचालक अरविंद भादिकर (संचालन तथा मानव संसाधन), प्रसाद रेशमे (प्रकल्प), अनुदीप दिघे (वित्त), योगेश गडकरी (वाणिज्य), कार्यकारी संचालक (प्रकल्प) धनंजय औंढेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांचा भाजीपाला, दूध बंद आंदोलनाचा इशारा

## शेतकऱ्यांचे कर्ज माफीसाठी सहकार आयुक्तांना निवेदन

**नाशिक ।** आगामी १४ एप्रिलपर्यंत शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले नाही तर १५ एप्रिलपासून महाराष्ट्रभर भाजीपाला व दूध बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ पाटील यांनी पुणे येथे सहकार आयुक्तांच्या दालनाबाहेर केलेल्या धरणे आंदोलन प्रसंगी निवेदनाद्वारे दिला.




महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू असे सर्वच राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकीच्या वेळी आपल्या वचन नामा व जाहीरनाम्यामध्ये जाहीर केले होते. विधानसभेचे अधिवेशन होऊनही अर्थसंकल्प सादर केल्यानंतरही शासनाने शेतकऱ्याची कर्जमाफी न केल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे बुधवारी पुणे येथे सहकार आयुक्त कार्यालयासमोर एक दिवसाचे धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये शेतकरी संघटनेचे रघुनाथ पाटील, शेतकरी समन्वय समितीचे अध्यक्ष भगवान बोराडे, सदस्य दिलीप पाटील, ९३८ आदिवासी विकास सोसायटीचे राज्याध्यक्ष कैलास बोरसे, शिवाजी नंदा खिले, पांडुरंग रायते, अजित काळे ,वसंत लोणारी, आप्पासाहेब दिघे, वस्ताद दौंडकर, बबन दौंडकर, सोपान महाजन, कैलास लोणारी व इतर शेतकरी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी शेतकरी संघटना शरद पवार गट, आम आदमी पार्टी, स्वाभिमानी शेतकरी संघटना यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### विश्व हिंदू परिषद बजरंग दलाचा निवेदनाद्वारे इशारा

**नाशिक ।** "उझबेकी आक्रमक बाबर याचा वंशज क्रूरकर्मा औरंगजेब याची छत्रपती संभाजी नगर येथील कबर हटवावी अन्यथा ती उध्वस्त करण्यात येईल!" असा सज्जड इशारा विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाने एका निवेदनाद्वारे दिला आहे. मुख्यमंत्र्यांना उद्देशून जारी केलेल्या या



निवेदनाची प्रत आज निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. नाशिक मधील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर या आंदोलनात सहभागी झाले होते. या निवेदनात म्हटले आहे की, "क्रूरकर्मा औरंगजेब अहिल्यादेवी नगर येथे मरण पावला नंतर त्याचे प्रेत छत्रपती संभाजी नगर येथे नेण्यात येऊन तेथे त्याची कबर करण्यात आली. याच औरंगजेबाने शिख धर्मगुरू तेग बहादुर यांची हत्या केली. शीख गुरू गोविंद सिंह यांच्या दोन बाल साहेब राजांना ते केवळ मुस्लिम होत नाहीत म्हणून त्यांना भिंतीत चिणून जिवंतपणे मारण्यात आले. छत्रपती संभाजी महाराजांची क्रूर हत्या भयंकर पद्धतीने करण्यात आली. काशी विश्वेश्वराचे मंदिर औरंगजेबाने फोडले. मथुरेला असलेल्या सुंदर मंदिराचा विध्वंस केला. त्र्यंबकेश्वर जेजुरी गड याच्यावर हल्ले केले. हजारो हिंदूंच्या प्रेताच्या राशी गावाबाहेर रचून हिंदूंची भयानक करून कत्तल केली. छत्रपती शाहू महाराजांचे अनेक वेळा धर्म परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. हिंदूंचे मोठ्या प्रमाणावर धर्मांतरण केले. अशा क्रूरकर्मा व आतताई औरंगजेबाचे कुठलेही स्मारक अथवा कबर ही पूर्णपणे स्वतंत्र भारत देशात गुलामीपणाचेच अनंत यातनांचे प्रतीक आहे. आम्ही सर्व आपणास विनंती करतो की आपण ही कबर पूर्णपणे नष्ट करावी. परकी यांचे कुठलेही नामोनिशाण हे नष्ट झाले पाहिजे. तरी आपण योग्य पद्धतीने ही कबर पूर्णपणे काढून टाकावी व हे न झाल्यास विश्व हिंदू परिषद, बजरंग दल हिंदू समाजाबरोबर छत्रपती संभाजी नगराकडे कार सेवेसाठी कुछ करतील व औरंगजेबाची कबर ध्वस्त करतील." असा गंभीर इशारा विश्व हिंदू परिषद व बजरंग दलातर्फे देण्यात आला आहे. या आंदोलनात श्रीकांत क्षत्रिय (बजरंग दल महानगर संयोजक,) विश्व हिंदू परिषद विभाग मंत्री अनिल चांदवडकर, नासिक जिल्हा मंत्री योगेश बहाळकर आदींसह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### किमान तापमानाबरोबरच उकाडा वाढला: नागरिक हैराण

**नाशिक ।** शहरात उन्हाची वाढलेली तीव्रता मागील तीन चार दिवसांच्या तुलनेत काही अंशी कमी झाली आहे कमाल तापमानात काही अंशी घट झाली असतानाच किमान तापमानात मात्र वाढ झाल्याने रात्रीचा उखाडा वाढला आहे रविवार दिनांक १६ किमान तापमान थेट २१.२ अंशापर्यंत पोहोचल्याने वातावरणात अधिक उकाडा जाणवत होता सोमवारी दिनांक १७ कमाल ३५.६ व किमान १९.९ तापमानात काहीशी घट झाली मात्र काहीशा ढगाळ वातावरणामुळे हो काळा कायम आहे नाशिक शहर व परिसरात मागील आठवड्यात बुधवारी दिनांक १२ कमाल तापमान ३८.७ अंश सेल्सिअस नोंदले गेले यात काहीशी घट होऊन रविवारी दिनांक १६ ते ३६.१ अंश सेल्सिअस वर आलेत दुपारच्या सुमारास अधून मधून ढग दाटून येत असल्याने उन्हाच्या जळांची तीव्रता ही काही प्रमाणात कमी झालेली जाणवली शनिवारी दिनांक १५ रात्रीपासूनच वातावरणात उकाड्यात वाढ झाली त्यामुळे रात्री देखील घाम निघू लागला आहेत किमान तापमान चा पाराही वाढला असून सतरा अंश सेल्सिअस पर्यंत असलेल्या किमान तापमानानेही उच्चांक गाठत रविवारी दिनांक १६ २१.२ अंश सेल्सिअस वर झेप घेतली.

### यंदा ४ कुंभमेळाच्या धर्तीवर प्लॅटिनमची रंगपंचमी

**नाशिक ।** जैन सोशल ग्रुप प्लॅटिनमच्या वतीने यंदा उज्जैन, प्रयागराज, हरिद्वार, नाशिक या चार पवित्र कुंभमेळ्याच्या धर्तीवर यंदाची रंगपंचमी खेळली जाणार असल्याची माहिती अध्यक्ष यश टाटीया, सेक्रेटरी उर्विश कोठारी यांनी दिली. सदरची रंगपंचमी बुधवार, १९ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासुन श्रद्धा लॉन्स, नाशिक येथे खेळली जाणार आहे. सदरची रंगपंचमी फक्त सभासदांसाठीच असून ढोल ताशा, रंगोत्सव, रेनडान्स, गेम्स तसेच ४ कुंभमेळ्याच्या शहरातील भोजनाचे विवीध प्रकार असतील असे प्रकल्प संचालक राहूल पारख, निलेश कोचर, सोनम जैन यासह समन्वयक अमोल समदडीया, श्वेता समदडीया, भुषण खिंवसरा, सोनल खिंवसरा, मयुर लुणावत, संकेत गिडीया, पिनल गिडीया यांनी कळविले आहे.

### अंबालाल नहार यांचे निधन



**नाशिक ।** येथील रविवार कारंजा जैन स्थानकचे मार्गदर्शक सुश्रावक अंबालाल रामचंद्र नहार (वय ८८) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, जावई, सुन, नातसुन, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अभय नहार यांचे ते वडील होत.



# परदेशी गुंतवणूकदार परतले
# शेअर बाजारात सलग पाचव्या दिवशी तेजी

**मुंबई, दि.२१ प्रतिनिधी**

डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाची मजबूत स्थिती आणि परदेशी गुंतवणूकदारांकडून सुरु झालेल्या खरेदीच्या जोरावर शुक्रवारी भारतीय शेअर बाजाराने सलग पाचव्या दिवशी तेजी नोंदवली. सेन्सेक्स ५५७ अंकांनी वाढून ७६,९०५ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक १५९ अंकांच्या वाढीसह २३,३५० वर स्थिरावला.

सेन्सेक्स- निफ्टीची आज कमकुवत सुरुवात झाली होती. पण परदेशी गुंतवणूकदारांनी विक्री कमी करुन खरेदीवर जोर दिल्याच्या आशावादामुळे दोन्ही निर्देशांकांनी तेजीच्या दिशेने चाल केली.

क्षेत्रीय पातळीवर कंझ्यूमर ड्युरेबल्स आणि मेटल वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक हिरव्या रंगात बंद झाले. ऑईल आणि गॅस, मीडिया, टेलिकॉम हे निर्देशांक प्रत्येकी २ टक्क्यांनी वाढले. निफ्टी बँक आणि निफ्टी फायनान्सियल सर्व्हिसेस प्रत्येकी १ टक्के वाढले. बीएसई मिडकॅप १.१ टक्के आणि स्मॉलकॅप २ टक्के वाढला.

बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल २१ मार्च रोजी ४.७८ लाख कोटींनी वाढून ४१३.३९ लाख कोटींवर पोहोचले. बीएसईवर आज तेजीसह बंद झालेल्या शेअर्सची संख्या अधिक राहिली. बीएसईवर एकूण ४,१६२ शेअर्समध्ये व्यवहार दिसून आला. त्यातील २,८२४ शेअर्स तेजीत राहिले. तर १,२१२ शेअर्समध्ये घसरण झाली. दरम्यान, १२६ शेअर्स कोणत्याही चढ-उताराविना बंद झाले.

सेन्सेक्सवर एनटीपीसी, बजाज फायनान्स, कोटक बँक, नेस्ले इंडिया, सन फार्मा, टाटा मोटर्स, एलटी, ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, भारती एअरटेल, पॉवर ग्रिड हे शेअर्स १ ते ३ टक्के वाढले. तर इन्फोसिस, एम अँड एम, टाटा स्टील, टायटन हे शेअर्स प्रत्येकी १ टक्के घसरले.

निफ्टीने गेल्या चारही सत्रांत वाढ नोंदवली आहे. निफ्टीची ही सात आठवड्यांतील सर्वात चांगली कामगिरी आहे. आजच्या वाढीसह या आठवड्यात निफ्टी सुमारे ४ टक्के वाढला.

**सेन्सेक्स 76,905**

**निफ्टी 23,350**

'एनएसई'वरील आकडेवारीनुसार, २० मार्च रोजी परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार पुन्हा निव्वळ खरेदीदार बनले. त्यांनी एका दिवसात ३,२३९.१४ कोटी रुपयांच्या भारतीय शेअर्सची खरेदी केली. तर देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांचा विक्रीवर जोर राहिला. त्यांनी ३,१३६ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली. यंदा आतापर्यंत परदेशी गुंतवणूकदारांनी १.६५ लाख कोटींच्या शेअर्सची विक्री केली. तर देशांतर्गत गुंतवणूकदारांनी १.८५ लाख कोटी रुपयांच्या शेअर्सची खरेदी केली.

आज गुंतवणूकदारांच्या भावना उंचावण्यात भारतीय रुपयाचीही महत्त्वाची भूमिका राहिली. आज भारतीय रुपया १४ पैशांच्या वाढीसह खुला झाला. त्यानंतर तो आणखी मजबुतीसह बंद झाला. या आठवड्यात रुपया जवळपास १ टक्केने वाढला आहे. आज दिवसभरात रुपया ४१ पैशांनी वधारला आणि तो ८६.३६ रुपयांवर बंद झाला. विशेष म्हणजे जानेवारीनंतर पहिल्यांदाच रुपया मजबूत स्थितीत दिसून आला आहे.

# कर्नाटक विधानसभेत मुस्लिम आरक्षण विधेयक मंजूर
## मोठा गदारोळ, अध्यक्षांसमोर कागदपत्रे भिरकावली

**बंगळुरू, दि. २१ वृत्तसंस्था**

हनी ट्रॅप प्रकरणावरून कर्नाटक विधानसभेत शुक्रवारी मोठा गदारोळ झाला. भाजपचे आमदार सभागृहाच्या वेलमध्ये शिरले आणि त्यांनी अध्यक्षांच्या खुर्चीसमोर कागदपत्रे फाडली आणि भिरकावली. या गोंधळामुळे कर्नाटक विधानसभेचे कामकाज तहकूब करण्यात आले. दरम्यान, या गोंधळातच राज्य सरकारने सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर केले. भाजपने हा निर्णय असंवैधानिक असल्याचे सांगत त्याला कायदेशीररित्या आव्हान देणार असल्याचे म्हटले आहे.



काही मंत्र्यांसह प्रभावी नेत्यांना हनी ट्रॅपमध्ये अडकवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा विषय सध्या कर्नाटक विधानसभेत गाजला आहे. आज शुक्रवारीदेखील या प्रकरणाचे पडसाद विधानसभेत उमटले. एका वरिष्ठ मंत्र्यांसह ४८ जणांशी संबंधित हनीट्रॅप प्रकरणाच्या आरोपांवरून विरोधकांनी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना लक्ष्य केले. यावरुन कर्नाटक विधानसभेत प्रचंड गोंधळ उडाला.

"हा एका पक्षाचा मुद्दा नाही. तर जनतेसाठी काम करणाऱ्या आमदारांविरुद्ध हा मोठा कट रचला जात आहे. काही जण छुप्या अजेंडासह हनी ट्रॅप करत आहेत," असे विरोधी पक्षनेते आर. अशोक यांनी सांगितले.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी, हनीट्रॅप प्रकरणी कोणालाही संरक्षण दिले जाणार नसल्याचे स्पष्ट केले. त्यांनी असेही नमूद केले की जी परमेश्वरा यांनी के. एन. राजण्णांच्या आरोपांची यापूर्वीच दखल घेतली आहे. या प्रकरणी चौकशी सुरू असल्याचे ते म्हणाले.

कायद्यानुसार, दोषींना शिक्षा व्हायलाच हवी. गृहमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे की जर राजण्णा यांनी तक्रार केली तर उच्चस्तरीय चौकशी केली जाईल. या प्रकरणी राजण्णा यांनी कोणाचेही नाव घेतलेले नाही. जर त्यांनी कोणाचे नाव घेतले तर कारवाई केली जाऊ शकते. या प्रकरणात कोणालाही संरक्षण देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही," असे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सांगितले.

# एअर इंडियाच्या विमानात प्रवाशाचा मृत्यू; लॅंडिंगनंतर घटना उघडकीस

**लखनौ, दि. २१ वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथील चौधरी चरण सिंह आंतरराष्ट्रीय विमानतळावर एअर इंडिया फ्लाइट AI2845 मध्ये एका प्रवाशाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. हे विमान सकाळी 8:10 वाजता दिल्लीहून लखनौला पोहोचले. मृत प्रवाशाची ओळख आसिफुल्ला अंसारी म्हणून झाली आहे. त्यांच्या मृत्यूचे कारण पोस्टमार्टम अहवालानंतर स्पष्ट होईल.

विमान लखनौमध्ये पोहोचल्यानंतर क्रू मेंबर्सनी प्रवाशांना सीट बेल्ट काढून उतरायला सांगितले. मात्र, आसिफुल्ला अंसारी आपल्या सीटवर हालचाल न करता बसून राहिले. क्रू मेंबर्सनी त्यांना जागे करण्याचा प्रयत्न केला, पण ते कुठलाही प्रतिसाद देत नव्हते. डॉक्टरांना बोलावण्यात आले, त्यांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले. विशेष म्हणजे, विमान लॅंड झाल्यानंतरही त्यांनी सीट बेल्टही काढला नव्हता, त्यामुळे त्यांच्या प्रवासादरम्यानच मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.




या संशयास्पद मृत्यूमुळे पोलीस अधिक तपास करत आहेत. प्रवाशाची तब्येत आधीपासून बिघडलेली होती का किंवा प्रवासादरम्यान काही आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या होत्या का, हे शोधले जात आहे. तसेच, त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून वैद्यकीय इतिहासाची माहिती घेतली जात आहे. पोस्टमार्टम अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल.

# शरीर संबंध ठेवण्यासाठी पत्नी पैशांची मागणी करते, पतीने दाखल केली तक्रार

**बंगळुरू, दि. २१ वृत्तसंस्था**

बंगळुरूमधील एका सॉफ्टवेअर अभियंत्याने त्याच्या पत्नीवर गंभीर आरोप केला आहे. शरीर संबंध ठेवण्यासाठी पत्नी पैशांची मागणी करते, अशी तक्रार पतीने दाखल केली आहे. तर पत्नीनेही पतीविरोधात कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दाखल केली आहे. सदर पतीने बंगळुरूच्या व्यालिकवल पोलीस ठाण्यात पत्नीविरोधात तक्रार दाखल केली असून पत्नीवर मानसिक आणि शारीरिक छळवणुकीचा आरोप केला आहे.

पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, श्रीकांत आणि बिंदुश्री यांचे ऑगस्ट २०२२ मध्ये लग्न झाले होते. लग्न जुळविणाऱ्या संकेतस्थळावरून दोघांची ओळख झाल्यानंतर त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला होता. श्रीकांतने आरोप केला की, लग्न होण्याच्या आधीच सासूने त्याच्याकडे पैसे मागितले होते. श्रीकांतने केलेल्या दाव्यानुसार, त्याने सासूच्या अकाऊंटमध्ये तीन लाख रुपये पाठवले होते. तसेच लग्नात खर्चासाठी ५० हजार रुपयेही दिले होते.

श्रीकांतने तक्रारीत पुढे म्हटले की, लग्नाला दोन वर्ष होऊनही पत्नी शरीर संबंध ठेवण्यास नकार देत होती. जर शरीर संबंध ठेवायचे असतील तर दररोजचे पाच हजार रुपये द्यावे लागतील, असे पत्नीने सांगितल्याचा आरोप पतीने केला आहे.

श्रीकांत जेव्हा जेव्हा पत्नीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करायचा, तेव्हा तेव्हा पत्नी चिठ्ठीत त्याचे नाव लिहून आत्महत्या करण्याची धमकी द्यायची. तसेच माझ्या गुप्तांगाला जखम करून माझी हत्या करण्याचा प्रयत्नही केला, असाही आरोप श्रीकांतने तक्रारीत केला आहे.

श्रीकांतने पुढे म्हटले की, पत्नी आणि तिच्या कुटुंबाने माझ्याकडून प्रति महिना ७५ हजार रुपयांची मागमी केली होती. बिंदुश्री आणि तिच्या आईने घर घेतले होते. या घराचा हप्ता त्यांना माझ्याकडून घेतलेल्या पैशातून भरायचा होता.

श्रीकांतने पत्नीचा आणखी एक विचित्र प्रकार तक्रारीत कथन केला आहे. घरून काम करत असताना जेव्हा श्रीकांत ऑफिसच्या मीटिंगमध्ये असायचा तेव्हा पत्नी जाणूनबुजून वाद घालायची किंवा स्क्रिनसमोर येऊन नृत्य करायची. यामुळे त्याला नोकरी गमवावी लागली. या प्रकाराचा पुरावा असावा म्हणून श्रीकांतने या विचित्र चाळ्याचे व्हिडीओ चित्रीत केले असल्याचे सांगितले.

पत्नीच्या वर्तनाला कंटाळून श्रीकांतने तिला घटस्फोट देण्याचा निर्णय घेतला. मात्र पत्नीने तडजोडीसाठी ४५ लाख रुपयांची मागणी केली.


# माझे भारताशी खूप चांगले संबंध, फक्त एक समस्या आहे - डोनाल्ड ट्रम्प

**वॉशिंग्टन, दि. २१ वृत्तसंस्था**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या निर्णयांची जगभर चर्चा होत आहे. खुद्द अमेरिकेतही काही गटांनी त्यांच्या निर्णयांवर टीका केली असताना दुसरीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर काही देश त्यांना समर्थन देत असून काहींनी विरोध दर्शवला आहे. विशेषत: बेकायदा स्थलांतरीतांची घरवापसी आणि इतर देशांवर टेरीफ लागू करण्याची भूमिका. या मुद्द्यावरून सध्या ट्रम्प यांचे भारताशी संबंध काहीसे अडचणीत आले असताना त्यावर त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी अमेरिकेतील संकेतस्थळ 'ब्रेईटबार्ट न्यूज'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांच्या आंतरराष्ट्रीय संबंधांवर सविस्तर भाष्य केले. यावेळी त्यांनी भारताकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर लागू करण्यात येणाऱ्या टेरिफवर भाष्य केले.

"माझे भारताशी खूप चांगले संबंध आहेत, पण फक्त एक समस्या आहे. भारत हा जगातला सर्वाधिक टेरिफ दर आकारणाऱ्या देशांपैकी एक देश आहे. मला विश्वास आहे की ते कदाचित आगामी काळात त्यांचे टेरिफ दर कमी करण्याची शक्यता आहे. पण २ एप्रिलपासून अमेरिकेकडून भारतावर तेवढेच दर आकारले जातील, जेवढे दर ते आमच्यावर आकारतात", अशी ठाम भूमिका अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यावेळी मुलाखतीमध्ये मांडली.



दरम्यान, इंडिया-मिडल इस्ट-युरोप इकोनॉमिक कॉरिडॉर अर्थात आयएमईसीबद्दल बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांनी सकारात्मक भूमिका मांडली. "हा एक अतिशय उत्तम देशांचा समूह आहे. व्यापारविषयक बाबतीत आमच्या हितसंबंधांना धक्का लावणाऱ्या देशांचा सामना या गटाकडून केला जातो. व्यापार क्षेत्रात आमचे खूप खंबीर सहकारी आहेत", असे डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. मात्र, असे म्हणताना त्यांनी अमेरिकेचे हितसंबंध न जपणाऱ्यांविषयीची भूमिकाही स्पष्ट केली.

"आम्ही आमच्या अशा मित्रांना सोडू शकत नाही जे आम्हाला या बाबतीत वाईट वागणूक देतात. उलट आम्ही आमच्या मित्रांपेक्षा मित्र नसणाऱ्या राष्ट्रांच्या बाबतीत चांगली कामगिरी करत आहोत. जे आमचे मित्र नाहीत ते आमच्याशी काही बाबतीत मित्र असणाऱ्या राष्ट्रांपेक्षा चांगले वागतात. उदाहरणार्थ युरोपियन यूनियन. युरोपियन युनियनकडून आम्हाला व्यापाराच्या बाबतीत वाईट वागणूक मिळते", असे ट्रम्प यांनी नमूद केले.

# शेअर बाजाराची सकारात्मक वाटचाल

**मागील सुमारे सहा आठवड्यापासून सातत्याने कोसळणारा राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक आणि निफ्टी देखील आता दोन दिवसापासून वधारताना दिसतो आहे. मोठ्या प्रमाणात गुंतवणूक काढून घेणाऱ्या कंपन्या आणि गुंतवणूकदारांचा पुन्हा एकदा गुंतवणुकीकडे कल वाढतोय. थोडक्यात शेअर बाजाराची वाटचाल आता पुन्हा नव्याने सकारात्मक दिशेने सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर अर्थतज्ज्ञ शशांक गुलगुले यांच्याशी साप्ताहिक संवाद.**

**१]शेअर बाजाराची सध्याची नेमकी स्थिती काय आहे?**

शेअर बाजार मागील तीन दिवसापासून सातत्याने वधारत असल्यामुळे गुंतवणूकदारांना खूप फायदा झालेला आहे. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक बुधवारी १४७. ७९ अंकांनी वधारून ७५४४९. ०५ वर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ७३. ३० अंकांनी वर जात २२९०७. ६० वर स्थिरावला. बीएसई सूचिबद्ध कंपन्यांच्या बाजार भांडवलात १३. ८२ लाख कोटींची वाढ झाल्याने गुंतवणूकदारांच्या भांडवली संपत्तीत तेवढी भर पडलेली आहे. एकूणच सध्याचे शेअर बाजारचे वातावरण हे सकारात्मक दिसते आहे.

**२]सेन्सेक्स मधील ज्या भांडवली कंपन्या आहेत,त्या सूचिबद्ध कंपन्यांची नाव काय आहेत?**



लोकरंग

सेन्सेक्सची उभारणी करणाऱ्या ३० कंपन्यांपैकी टाटा स्टील,झोमॅटो, पॉवरग्रीड,अल्ट्राटेक सिमेंट,इंडसइन बँक,लार्सन अँड टूरबो,अडाणी पेंट्स,एनटीपीसी,भारतीय स्टेट बँक आणि रिलायन्स इंडस्ट्रीज यांचे समभाग वधारले आहेत,तर टेक महिंद्रा,टीसीएस आयटीसी,इन्फोसिस,एचसीएल टेक,सॅन फार्म,मारुती सुझुकी इंडिया,आणि नेस्ले कंपनीचे समभाग घसरले आहेत.

साप्ताहिक संवाद

**३] मुंबई शेअर बाजाराची आजची खास वैशिष्ट्य काय सांगता येतील?**

खास वैशिष्ट्य हीच कि तब्बल महिन्याभरानंतर शेअर बाजारातील कंपन्यांच्या बाजार भांडवलानी ४०० लाख कोटींचा टप्पा ओलांडला. बीएसई मिडकॅप २.२८ टक्के वधारला आणि बीएसई स्माल कॅप २ . १७ टक्के वर गेला. सूचिबद्ध कंपन्यांपैकी ३०१८कंपन्यांचे समभाग वधारले तर १०३३ कंपन्यांचे समभाग घसरले. आणि ११५ कंपन्यांचे समभाग जैसे थे राहिले. सातत्याने समभाग विकून निधी स्वदेशी नेणाऱ्या परदेशी कंपन्यांनी ६९४.५७कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी केली.

# उषा इंटरनॅशनलची मुंबई इंडियन्स सोबत सलग बाराव्या वर्षी भागीदारी

क्रीडांगण

भारतातील आघाडीचा टिकाऊ वस्तूंचा ब्रँड, उषा इंटरनॅशनलने पाच वेळा विजेतेपद पटकावलेल्या मुंबइ इंडियन्स (मेन्स) क्रिकेट संघासोबत पुन्हा एकदा नव्याने भागीदारी केली आहे. त्यामुळे त्यांच्या भागीदारीची सलग




१२ वर्षे पूर्ण होत आहेत. ही भागीदारी मुंबइ इंडियन्सच्या "प्ले लाइक मुंबइ" या ब्रीदवाक्याशी जुळते. हे वाक्य मुंबइतील क्रिकेटचा आत्मा दर्शवते आणि त्याचबरोबर 'उषा'च्या सक्रिय आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्याच्या वचनबद्धतेशीही एकरूप ठरते.

बहुप्रतिक्षित २०२५ क्रिकेट हंगामाची सुरुवात २२ मार्च रोजी इडन गार्डन्स, कोलकाता येथे होत आहे. मुंबइ इंडियन्सचा पहिला सामना २३ मार्च रोजी एम.ए. चिदंबरम स्टेडियम, चेन्नइ येथे खेळला जाणार आहे. या भागीदारीचे निशाण म्हणून, 'उषा'चा लोगो मुंबइ इंडियन्सच्या सर्व खेळाडूंच्या कॅप्स आणि हेल्मेटवर ठळकपणे दिसेल, ज्यामुळे संपूर्ण स्पर्धेत दृश्यमानता सुनिश्चित होइल. याव्यतिरिक्त, 'उषा प्ले' हे ब्रँडिंग सामन्यांदरम्यान पेरिमिटर बोर्ड आणि डिजिटल स्क्रीनवर प्रदर्शित केले जाइल, ज्यामुळे क्रिकेट चाहत्यांशी अधिक संवाद साधला जाइल.

या नित्य सहकार्यावर भाष्य करताना, उषा इंटरनॅशनलच्या क्रीडा उपक्रम आणि संघटना प्रमुख कोमल मेहरा म्हणाल्या, "उत्कृष्टता, सहनशीलता आणि खेळाची आवड या समान मूल्यांवर आधारित असलेली आमची मुंबइ इंडियन्ससोबतची भागीदारी कालांतराने अधिक मजबूत झाली आहे. भारतात आणि जागतिक स्तरावरही क्रिकेट हा केवळ एक खेळ नाही - ती एक भावना आहे जी लाखो लोकांना एकत्र आणते. लोकांना सक्रिय जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रेरित करताना आम्ही या भावनेचा उपयोग करण्याचे उद्दिष्ट बाळगतो."

# नाशकातील टाकसाळ

नाशिक हे गोदावरी नदीच्या काठावर वसलेले छोटे शहर आहे. हे शहर एक महत्त्वाचे हिंदू तीर्थक्षेत्र आहे, कारण येथे कुंभमेळ्याचा केंद्रबिंदू आहे. तुम्ही वर्षाच्या कोणत्याही वेळी शहराला भेट देऊ शकता, कारण हवामान खूप आनंददायी आहे. हे अशा मोजक्या शहरांपैकी एक आहे जिथे लोक पावसाळ्यातही सुरक्षितपणे ट्रेकिंगला जाऊ शकतात. नाशिकमध्ये मोठ्या संख्येने पाहण्यासारखी ठिकाणे आहेत त्यामुळे अनेक पर्यटक येथे येतात. कॉईन म्युझियम हे नाशिक शहराच्या परिसरात भेट देण्याच्या सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक आहे. कॉइन म्युझियममध्ये नवीन आणि जुन्या भारतीय चलनांचा उत्कृष्ट संग्रह आहे. हे संग्रहालय 1980 मध्ये सुरू झाले आणि संपूर्ण आशिया खंडातील आपल्या प्रकारचे हे एकमेव संग्रहालय आहे. नाशिकच्या अंजनेरी टेकडीच्या मधोमध असलेले नाणे संग्रहालय पर्यटकांसाठी खुले आहे ज्यांना नाण्यांबद्दल जाणून घेण्याची आवड आहे. तुम्हाला येथे हडप्पा संस्कृतीतील जीवाश्म आणि कलाकृतींचे काही प्रदर्शन देखील सापडतील. याव्यतिरिक्त, आपण नाणे मिंटिंग आणि नाणे उत्पादन तंत्र दर्शविणारे डायोरामा पहाल. संग्रहालय पर्यटकांसाठी रविवार आणि सार्वजनिक सुट्टी वगळता सर्व दिवस सकाळी 9.30 ते दुपारी 1 आणि दुपारी 2 ते 5.30 या वेळेत खुले असते आणि त्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क लागत नाही.




चला पर्यटनाला

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# लंडनमध्ये सबस्टेशनला आग
## हिथ्रो विमानतळ केले बंद
## हजारो घरांची बत्ती गुल

**लंडन, दि. २१ वृत्तसंस्था**

लंडनच्या पश्चिम भागातील एका सबस्टेशनला लागलेल्या आगीमुळे लंडनचे हिथ्रो विमानतळ मध्या रात्रीपर्यंत बंद करण्यात आले आहे. यामुळे येणाऱ्या आणि जाणाऱ्या किमान १,३५१ विमानांना याचा फटका बसला आहे. या आगीच्या घटनेमुळे शहरातील अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणात वीज खंडीत झाली असून १६ हजारहून अधिक घरांमधील वीज गेली आहे. ब्रिटिश माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, १५० हून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे.

लंडन अग्निशमन दलाने सांगितले की, त्यांनी सुमारे १० फायर इंजिन्स आणि जवळपास ७० अग्निशामक दलाचे जवान तैनात केले आहेत. याबरोबरच २०० मीटरचा सुरक्षा घेरा तयार करण्यात आला आहे. दरम्यान आग लागलेले सबस्टेशन हे लंडनच्या Hillingdon borough मधील Hayes येथे असून येथील स्थानिक रहिवाशांना धुरामुळे घरात राहण्यास आणि खिडक्या आणि दरवाजे बंद ठेवण्यास सांगण्यात आले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्टवर पोस्ट करता विमानतळ व्यवस्थापनाने सकाळी (भारतीय वेळेनुसार) प्रवाशांना प्रवास टाळण्याचा सल्ला दिला असून पुढील माहितीसाठी त्यांच्या संबंधीत एअरलाईनशी संपर्क साधण्यास सांगितले आहे. "विमानतळाला वीज पुरवठा करणाऱ्या इलेक्ट्रिक सबस्टेशला आग लागल्याने, हिथ्रो विमानतळाचा वीज पुरवठा मोठ्या प्रमाणात खंडीत होत आहे. आमच्या प्रवाशांच्या आणि सहकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी हिथ्रो २१ मार्च रोजी रात्री ११.५९ पर्यंत बंद असेल," असे विमानतळाकडून सांगण्यात आले आहे.

# भारतात कोळसा उत्पादन 1 अब्ज टन पार ; मोदींकडून कौतुक

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**

भारताने कोळसा उत्पादनात दमदार कामगिरी करत, एतिहासिक टप्पा गाठला आहे. भारताने कोळसा उत्पादनात १ अब्ज (१०० कोटी) टनचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. या बद्दलची माहिती तेलंगणा भाजपचे अध्यक्ष आणि केंद्रीय कोळसा आणि खाणमंत्री जी. किशन रेड्डी यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया एक्स अकाऊंटवरून दिली आहे.

केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी यांनी म्हटले आहे की, "भारताने कोळसा उत्पादनाचा एक अब्ज टनांचा टप्पा ओलांडला आहे ! अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कार्यक्षम पद्धतींसह, आम्ही केवळ उत्पादन वाढवले नाही, तर शाश्वत आणि जबाबदार खाणकाम देखील सुनिश्चित केले आहे. ही कामगिरी आमच्या वाढत्या वीज मागणीला चालना देईल, आर्थिक विकासाला चालना देईल आणि प्रत्येक भारतीयाचे उज्ज्वल भविष्य सुनिश्चित करेल. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, भारत जागतिक ऊर्जा नेता बनण्याच्या मार्गावर असल्याचे देखील रेड्डी यांनी म्हटले आहे."

'आपल्या देशाच्या ऊर्जा सुरक्षेचा कणा म्हणून काम करणाऱ्या कोळसा क्षेत्रातील समर्पित कर्मचाऱ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. तुमच्या अथक प्रयत्नांमुळे आणि वचनबद्धतेमुळे हे शक्य झाले आहे', असे देखील केंद्रीय मंत्री रेड्डी यांनी म्हटले आहे.

"१ अब्ज टन कोळसा उत्पादनाचा ऐतिहासिक टप्पा ओलांडणे ही एक उल्लेखनीय कामगिरी आहे. जी ऊर्जा सुरक्षा, आर्थिक वाढ आणि स्वावलंबनाप्रती आमची वचनबद्धता अधोरेखित करते. हे यश या क्षेत्राशी संबंधित सर्वांचे समर्पण आणि कठोर परिश्रम देखील प्रतिबिंबित करते.

# मोबाइलमुळे १० वर्षांत जगाचा नाश होईल- नितीश कुमार यांचा दावा

**पाटणा, दि. २१ वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपासून बिहारमधील राजकीय वातावरण तापलेले आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार आणि विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. अशात बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी नुकतेच विधानसभेत बोलताना दावा केला की, मोबाइल फोनच्या वापरामुळे १० वर्षांत पृथ्वीचा नाश होईल.



नितीश कुमार यांच्या या दाव्यानंतर एका नवीन राजकीय वादाला तोंड फुटले असून, बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी नितीश कुमारांच्या विधानावर टीका करत ते "रूढीवादी आणि तंत्रज्ञानविरोधी" असल्याचे म्हटले आहे.

मोबाइल फोनच्या अतिवापरामुळे पुढील १० वर्षांत पृथ्वीवरील जीवन संपुष्टात येईल, असा दावा केल्यानंतर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार देशभरात चर्चेत आले आहेत. बिहार विधानसभेच्या आवारातील मोबाइल फोनवरील बंदीबाबत चर्चा करताना कुमार म्हणाले की, जर या उपकरणांचा वापर असाच सुरू राहिला तर पुढील दशकात जग संपेल. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान, कुमार कृष्ण मोहन उर्फ सुदय यादव यांना पीडीएस डीलर्सबद्दल प्रश्न विचारताना मोबाइल फोन वापरत होते. हे लक्षात आल्यानंतर, मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला आणि सभागृहाला आठवण करून दिली की विधानसभेत मोबाईल फोनच्या वापरावर आधीच बंदी आहे. यावर नितीश कुमार यांनी सभापती नंद किशोर यादव यांच्याकडे आक्षेप नोंदवला आणि म्हटले की, "सभागृहात मोबाइल फोनवर बंदी आहे. मी तुम्हाला विनंती करतो की जो कोणी, विधानसभेत मोबाइल फोन घेऊन येईल त्याला सभागृहाबाहेर हाकलून लावावे."

# शोएब मलिकच्या दुसऱ्या लग्नाला कुटुंबही गेले नाही

**इस्लामाबाद, दि. २१ वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शोएब मलिक आणि भारतीय टेनिस स्टार सानिया मिर्झा हे २०२२ पासून त्यांच्या वैवाहिक जीवनातील अडचणींमुळे चर्चेत होते. यादरम्यान शोएब मलिक याच्या निकाहचे फोटो समोर आल्यानंतर दोघांच्या चाहत्यांना धक्का बसला होता. दरम्यान आता शोएब मलिक याच्या बहिणींने या सानिया- शोएब यांच्या विभक्त होण्याबद्दल तसेच शोएबच्या लग्नाबद्दल काही आश्चर्यकारक खुलासे केले आहे. शोएबच्या बहिणींनी या जोडप्याने घटस्फोट घेण्यामागे नेमकं काय कारण असू शकत याबद्दल सूचक माहिती दिली आहे. त्यांनी या दोघांच्या विभक्त होण्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. याबरोबरच कुटुंबिय त्याच्या (शोएब) निकाहला उपस्थित नव्हते असेही स्पष्ट केले आहे. याबरोबरच सानिया मिर्झा ही शोएबच्या कथित विवाहबाह्य संबंधांवर नाखूष होती असेही या रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे.

सानिया आणि तिच्या कुटुंबियांनी बराच काळ तिच्या घटस्फोटाबद्दल मौन बाळगले होते. मात्र शोएब मलिकने सना जावेदशी निकाह केल्यानंतर त्यांनी पहिल्यांदाच याबद्दल भाष्य केले होते. २१ जानेवारी २०२४ रोजी सानियाची बहीण अनम मिर्झा हिने इंस्टाग्रामवर एक नोट शेअर केली होती, ज्यामध्ये तिने सानिया काही महिन्यांपूर्वीच शोएबपासून विभक्त झाली होती असे सांगितले होते.

# 'या' मोबाईल नंबर्सची UPI सेवा 1 एप्रिलपासून होणार बंद

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**

सध्या मार्केटमध्ये बहुतांशी व्यवहार हे चलनाद्वारे न होता, युपीआयद्वारे (UPI) होत आहेत. यासाठी Google Pay, Phone Pay आणि अन्य अप वारले जातात. दरम्यान, युपीआय युजर्ससाठी ही मोठी बातमी आहे. कारण युपीआयला जोडलेले फोन नंबर जर वापरात नसतील ते निष्क्रिय असतील. तर १ एप्रिलपासून ते बंद करण्यात येणार आहेत, असे वृत्त आहे.

१ एप्रिल २०२५ पासून नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) निष्क्रिय मोबाइल नंबरशी लिंक केलेले यूपीआय आयडी डिलिंक करण्यास सुरुवात करेल. यामुळे प्रभावित युजर्सच्या डिजिटल पेमेंटमध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो. ही समस्या टाळण्यासाठी, तुमच्या बँक रेकॉर्ड तुमच्या सध्याच्या मोबाइल नंबरसह अपडेट केल्या आहेत याची खात्री करावी, असेदेखील कंपनीने म्हटले आहे.

एनपीसीआयने म्हटले आहे की, १ एप्रिल २०२५ पासून, ते निष्क्रिय मोबाइल नंबरशी लिंक केलेले यूपीआय आयडी डिलिंक करण्यास सुरुवात करेल. जर नोंदणीकृत मोबाइल नंबर निष्क्रिय असतील तर व्यवहारांसाठी गुगल पे, फोनपे, पेटीएम आणि इतर यूपीआय ॲप्स वापरणाऱ्या युजर्सवर याचा परिणाम होऊ शकतो. जर तुमचा फोन नंबर बराच काळ निष्क्रिय असेल, तर बँका त्यांच्या रेकॉर्डमधून तो काढतील आणि खात्यासाठी यूपीआय सेवा निलंबित केल्या जातील. बँकिंग सिस्टममधील तांत्रिक त्रुटी टाळण्यासाठी आणि फसवणुकीचा धोका कमी करण्यासाठी बँका हे करत आहेत, विशेषतः जेव्हा पुन्हा नियुक्त केलेले नंबर जुन्या बँक खात्यांशी जोडलेले राहतात. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव कंपनीकडून पावले उचलण्यात येत आहेत.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com